द्रष्टा या भूमीवर जन्माला यायलाच हवा असं निवृत्तीनाथांना कित्येक दिवस वाटत होतं. आज ती वेळ अचानक चालून आली होती. त्यांना हा द्रष्टा सापडला होता. म्हणून निवृत्तीनाथांनी पुढच प्रस्थान नेवाशाला ठेवण्याचा ज्ञानदेवांना आदेश दिला. सारे नेवाशाची वाट चालू लागले.

मंडळी नेवाशात आली. नेवाश्याची महती सांगताना निवृत्तीनाथ म्हणाले, ज्ञानदेवा सर्व सामान्य जीव ऐहीक दुःखाने व्याप्त आहे. त्यांच्यावर शुद्ध ज्ञानाचा वर्षाव करायला हे स्थान अतिशय सुयोग्य आहे. विष्णूने इथं देवाना अमृत वाटलं तू ज्ञानामृत वाट. श्रीकृष्ण अवतारात परमात्म्याने गीता सांगितली त्या श्रेष्ठ ग्रंथावर तू प्राकृतात भाष्य केलस तर गीतातल्या कर्मायोगाच्या विवरणामुळे जनतेची निश्चितपणे आत्मजागृती होईल. सद्‌गुरु निवृत्तीनाथांचे हे विचार ऐकून आणि तीच आज्ञा मानून ज्ञानेश्वरांनी होकार भरला आणि ज्ञानेश्वरीचा जन्म झाला. सारा जन समुदाय अमृतात न्हावून निघाला. प्रत्येक दिवशी ज्ञानेश्वरांची रसना शब्दकळेचा हात पकडून अखंड झरू लागली. दुःखितांच्या अंतःकरणावर अमृत प्रपात सांडू लागली आणि ज्ञानबिंदूचा हा अखंड अक्षय मेवा सदानंद भराभर लिहून घेऊ लागला. ज्ञानदेवांच्या कृपेने पूर्वीचा सदानंद आता सच्चिदानंद झाला होता.

संत शिरोमणी ज्ञानेश्वरांनी जन्म दिलेल्या ह्या ज्ञानेश्वरीची महती काय वर्णावी. प्रत्यक्ष ईश्वरी ज्ञानाचा अमूल्य ठेवाच ज्ञानेश्वरांनी आमच्या हाती ठेवला होता. मर्मबंधानी बांधून ठेवलेल्या ह्या गाठोड्यात होत काय तर...

**ज्ञान सागरी, उठल्या लहरी,**
**गीता ती झाली ज्ञानेश्वरी**
**आले हे ज्ञान घरी ईश्वरी ।।धृ०।।**

**कोण कोठला कोठून आला**
**ठावूक नाही इथे कोणाला**
**तरीही जो तो इथेच रमला**
**मायेच्या मंदिरी ।।१।।**

**स्वप्नमयी हा गूढ सापळा**
**मोहफुलावरी जो तो रमला**
**मोक्ष मार्ग हा उजळीत आला**
**ज्ञानदीप भूवरी ।।२।।**

**नसे राऊळी नसे मंदिरी**
**दीन होऊनी देव पुकारी**
**हृदय कोंदणी, कृष्ण मुरारी**
**जागवी रे अंतरी ।।३।।**

**कर्म हाच रे देव मंदिरी**
**कर्म हाच रे देव अंतरी**
**अंतरातल्या देव मंदिरी**
**कर्माला आचरी ।।४।।**

पैठणकरांना तर ज्ञानदेवानं आधीच जिंकलं होतं आणि आता गीतामृताचं मंथन करून ज्ञानेश्वरीच्या रुपाने तर सर्वांवर कळस चढविला होता. संकुचति मुठभर वैदिकांनी आपल्याच हातात ठेवलेली ज्ञानाची शिदोरी सर्वसामान्यासाठी खुली केली होती. ऐहिक सुखदुःखाच्या गर्तेत सापडलेल्या प्रत्येक जीवास मुक्तीचा मार्ग मोकळा करून दिला होता. मानवता हाच खरा माणसाचा धर्म आहे. इथे उच्च निच कोणी नाही. प्रत्येकाला भगवत चिंतनाचा अधिकार आहे हे दाखवून दिलं होतं.

ज्ञानेश्वरांच्या ह्या दिग्विजयाने दिपून गेलेले लोक भागवताची संथा घेत होते. ज्ञानेश्वरांना अनन्यभावाने शरण येत होते. त्यात संसार तापाने त्रस्त झालेले सामान्य लोक होते तसेच वैदिक ज्ञानाचा टेंभा मिरवणारे वेदांतीही होते. पण तरीही अजून विसोबा खेचर सारखे कर्मठ ब्राह्मण आळंदीत शिल्लक होतेच. त्यांना जिंकून त्यांच्या मनावर भागवताचं प्रतिबिंब पडावं असं ज्ञानदेवांना सारख वाटत होतं.

अशाच तऱ्हेच्या विचारांच्या तंद्रीत एका मध्यान्हकाळी ज्ञानदेवांनी ''ॐभवति भिक्षादेही'' असा विसोबांच्या घरापुढे पुकारा केला. ज्ञानदेवांना पाहताच विसोबा अत्यंत संतप्त झाले. त्यांनी ज्ञानदेवांना निघून जाण्यास फर्माविले. ज्ञानदेवांनी परोपरीने विसोबांना समजावण्याचा प्रयत्न केला. पण सारं पालथ्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणे निष्फळ ठरलं. विसोबांच्या मनावर त्याचा काडीमात्र परिणाम झाला नाही. उलट हातातला काकबळीच त्यांनी ज्ञानेश्वरांच्या अंगावर फेकून मारला.

तत्त्वज्ञ असले तरी ज्ञानेश्वर वृत्तीने कवी होते. त्यांच्या हळूवार मनाला हा अपमान सहन झाला नाही. त्यांच्या नेत्रातून वेदना अश्रूरूप घेऊन बाहेर पडली. मनात विचारांच आवर्त फिरू लागलं. आपण निवृत्तीनाथांना पूर्वी विचारलेल्या प्रश्नाच ज्ञानदेवांना स्मरण झालं. फलाशेचा विचार न करता कर्मच परमेश्वराला अर्पण करण्याच तत्त्वज्ञान सांगूनही माझा अनुत्तरीत प्रश्न अजून अनुत्तरतीच राहीलाय असं त्याना वाटू लागलं. माणूस म्हणून जगताना मी माणुसकीची बंधन कधीही झुगारली नाहीत. तरीही रूढीला संन्याशाच्या संततीचे हे माणूसपण अपेक्षित नाही. कुणी घडवायचा हा बदल? केव्हा होईल समाज सुधारणा? वर्णाश्रमाची क्षितीज व्यापक व्हावी म्हणून प्रत्यक्ष परमात्म्याला मी पैठणी साकडं घातलं. तिथल्या लोकांचा दृष्टीक्षेप नाहीसा झाला. पण सर्वसामान्य रुढीप्रिय लोकांच काय? समतेची महती एकाला कळून विकास पावतील

नाहीतर हे उच्चवर्णीय असाच अन्याय करीत सुटतील आणि अत्यंत वेदनेची भाकर आपल्या अश्रूमध्ये भिजवून खातील. दोघांच्यामध्ये असलेली ही वर्ण जातींची दरी तळापासून वरपर्यंत भरून येण शक्य नाही. निदान ह्या दोन्ही टोकांना जोडणारा एखादा सोपान तरी करायला हवा. आत्मस्वरुपाच पुन्हा मंथन करायला हवं. परमात्म्याशी पुन्हा सुसंवाद जोडायला हवा. विचारांच्या ह्या आवर्तात सापडलेले ज्ञानेश्वर झपाटल्यासारखे आपल्या पर्णकुटीत परत आले आणि आतून दार घट्ट लावून ध्यानस्थ बसले. भावसमाधीत निमग्न झाले.

धुणी धुवायला गेलेली मुक्ताई याचवेळी पर्णकुटीत परत आली. तिने ज्ञानदेवांना साद घातली पण आतून ओ आली नाही. कुडाच्या फटीतून आत ज्ञानेश्वर ध्यानस्थ बसलेले मात्र दिसत होते. नेत्रातून सारख्या अश्रूधारा वहात होत्या. ज्ञानेश्वरांची ती स्थिती पाहून मुक्ताबाईच हळूवार मन द्रवलं आणि आपल्या ज्ञानदादाची समजूत घालीत मुक्ताबाई म्हणू लागली.

**उठा ज्ञानदेवा उघडा कवाडे**
**दारी मुक्ताईचा जीव तडफडे ॥धृ०॥**

**ज्ञानसागरीचा सार्वभौम इंद्र**
**कष्टल्या जीवाना पौर्णिमेला चंद्र**
**आज अचानक हा ज्ञानेंद्र**
**का आवर्ती धडपडे ॥१॥**

**ठेविले विवेका टांगूनिया दारी**
**तिथे मिळावी रे कशी माधुकरी**
**सहा रीपूंच्या, माया मंदिरी**
**क्षमा कशी सापडे ॥२॥**

**हाती घेतली ज्ञान पताका**
**सेनापती का अश्रू ढाळता?**
**अवती भवती काटे असता**
**पुष्प पदी कां पडे ॥३॥**

मुक्ताईचा ह्या सहज सुलभ विचारांनी ज्ञानदेवांना हवा असलेला मार्ग सापडला होता. विसोबा खेचर खरोखरीच ज्ञानी आहेत पण मायेच्या जाळ्यात गुरफटले गेल्यामुळे ते अज्ञानी बनले आहेत हे ज्ञानेश्वरांना उमगलं. त्याना निवृत्तीनाथांचे शब्द आठवले. ज्ञानदेवांना निवृत्तीनाथ म्हणाले होते, ज्ञानदेवा हे कलीयुग आहे. परमेश्वराचे अस्तित्व चमत्कार घडल्याखेरीज कलीयुगाला होत नसते. पूर्णज्ञानाच्या सूर्यबिंबावर अहंभावाच सावट आलं आहे ते नाहीसं करायचं असेल तर चमत्कारच घडवायला हवा.

बस्. ठरलं. आणखी एक चमत्कार करायचा. ज्ञानदेवांनी तसं केलं आणि विसोबांच अज्ञान दूर झालं. ते अनन्यभावान ज्ञानेश्वरांना शरण आले. महादेवशास्त्र्यांचीही तीच गत झाली. चौदाशे वर्षे जगलेले वटसिद्ध चांगदेवही ज्ञानेश्वरांच्या चरणी लीन झाले. भागवताची पताकाही आता दिमाखाने फडकू लागील होती. ज्ञानदेवांच कार्य पूर्ण झालं होतं. आता ज्ञानाचा हा सूर्य अस्ताचली जावू पहात होता. त्यांनी निवृत्तीनाथांकडे संजीवन समाधीची अनुज्ञा मागितली. निवृत्तीनाथांनीही मोठ्या कष्टाने त्याना अनुज्ञा दिली आणि मग चैतन्याची ही ज्योत कार्तिक वद्य त्रयोदशीला शके १२१८ ला चैतन्यात विलीन झाल. जाता जाताही सर्वांना सांगून गेली.

**भरल्या घटीका,**
**समय पातला,**
**द्या हो निरोप द्या मजला**
**निघाला ज्ञाना वैकुंठीला ॥धृ०॥**

**कार्य करणे जन्म घेतला**
**कार्यभाग तो पूर्ण जाहला**
**आता कशाला राहू सांगा**
**मी उगाच आळंदीला ॥१॥**

**सरली नाती दोन घडीची**
**विसरून जा ती माया पुढची**
**मनात आपुल्या सदैव आठवा**
**त्या अनंत रंगाला ॥२॥**

**मुक्ता तू तर स्वयं देवता**
**सोपाना पूस डोळे आता**
**ज्ञानेश्वर हा ज्ञानरुपाने**
**अणू रेणूत भरला ॥३॥**

**बंधू नव्हे तुम्ही सद्‌गुरु माझे**
**तुम्ही सार्थक केले या जन्माचे**
**जन्मोजन्मी चरण हे तुमचे**
**लाभू द्या मजला ॥४॥**

**संजीवन मी घेतो समाधी**
**चिरंजीव मी ठरेन जगती**
**इंद्रायणीच्या काठावरती**
**बाळ तिचा बसला ॥५॥**

- ॐ तत् सत् -

□□□

# साईप्रचिती

– सौ. नीता जाधव, महाड



२४ डिसेंबर या दिवशी मी शिरडीला निघाले. जोडून नाताळची सुट्टी मिळाली होती. बाबांना भेटून बरेच दिवस झाले होते. मन पुन्हा पुन्हा शिरडीकडे धावत असते. वाटते ज्यांचा जन्म शिरडीत झाला ते किती भाग्यवान त्यांना रोजच बाबांचे दर्शन. बाबा पुढचा जन्म मला सुद्धा शिरडीत घाल ना. तुझ्या मंदिरात केर काढायला मिळाला तरी मी स्वतःला धन्य समजेन. पण मला हे पाय अखंड जोडू दे. सदैव तुझ्या नजरेसमोर मला ठेव. तुझ्याकडे पहाता पहाता या देहाचे भान विसरून जावे. बाबा तुझ्या दर्शनासाठी हा जीव व्याकूळ होतो.

शिरडीत पाऊल टाकताच माझे मन आनंदाने फुलून गेले. ध्यास होता तो फक्त साईदर्शनाचा. नाताळची सुट्टी पडली होती त्यामुळे शिरडीत गर्दीच गर्दी. शिरडीत आलेल्या सर्वसामान्य साईभक्ताला वाटत असते प्रसन्न मनाने मनसोक्त बाबांचे दर्शन घ्यावे. बस्स ! हीच एक साधीसुधी अपेक्षा. बाबांचे मनहारी दर्शन ज्यांच्यासाठी शेकडो गणिक मैलांचे अंतर पार करून वाटेल तो त्रास सोसून ते वेड्यासारखे धावत शिरडीला आलेले असतात. ते फक्त मोक्षादायी साईंच्या दर्शनासाठीच. तसे म्हटले तर साईंच्या भक्ताला साईंजवळ काही मागायची जरूरी नाही. तो फक्त साई पदासक्त असतो. न मागताच साई त्याला सर्व काही देत असतात. माझ्या भक्ताच्या धामी, अन्नवस्त्राची कमी कधी पडणार नाही. असे बाबांनीच सांगितले आहे. मला नेमके काय हवे काय नको हे माझ्यापेक्षा त्याला जास्त माहीत. उलट ''न मागे त्याची रमा होय दासी'' अशा

साईभक्ताला एकच एक आस असते आपल्या प्रियतम साईमाऊलीला भेटायची. डोळे भरून ते रूप पाहायचे. समाधीवर नतमस्तक होऊन सर्वस्वाची ओंजळ त्या भवतापहारक पाऊलांवर रिती करायची. भक्तांनी आपल्या भावभक्तीने घातलेल्या रंगीबेरंगी भर्जरी शालींमध्ये नटलेले, गुलाब पुष्पाप्रमाणे प्रसन्न असे ते तेजब्रह्म पहात पहात मनाने तृप्त व्हायचे. पण आज मला हे सुख उपभोगता येणार नव्हते यामुळे मन कष्टी झाले.

आत बाहेर रूम कुठेच शिल्लक नव्हती. आता हे सारे सामान ठेवायचे कुठे ? जे दोन हात निश्चितपणे साईला जोडायचे त्या हातात सामान घेऊन गर्दीत बाबांचे दर्शन तरी कसे घ्यायचे ? मनातून मी बाबांवर रागावले. ''बाब असे हो कसे केलेत ? इथे दर्शन द्यायचे नव्हते तर बोलाविलेत कशाला? तुम्ही बोलावल्याशिवाय आम्ही आलो का? खरं म्हणजे आईला भेटायला माहेर येऊ का ? असे कशाला विचारायला हवे ? एक तर हे ऐन थंडीचे दिवस. त्यात मला दम्याचा त्रास. बाबांच्या दर्शनाने बरे वाटेल म्हणून तर इथे आले ना. परंतु आता शिरडीत थांबणेही अशक्य झाले आहे. जशी तुमची इच्छा बाबा. काय करावे ते सुचत नव्हते. मंदिराच्या कळसाकडे दृष्टी पुन्हा पुन्हा वळत होती.

आवश्यक तेवढे सामान जवळ ठेवून बाकीचे लॉकरमध्ये ठेवले. टेकायला कुठे जागा मिळते का पहात होते. पण छे ! सगळीकडे माणसांचा सागर उसळला होता. त्यांना माणसे तरी कसे म्हणावे ? ते तर माझ्या लाडक्या 'साईंचे भक्त होते. केवढ्या आशेने आपल्या मुलाबाळांना घेऊन साईंच्या दर्शनाला ती सारी आली होती. बाबांचे दर्शन राहिले बाजूला. बिचाऱ्यांनी स्वतःच्या बरोबर आणलेल्या सामानाचे दर्शन घेत बसावे लागले होते. माहेरी आल्यासारखे चार दिवस बाबांच्या छायेत त्यांना रहायचे होते. पण आता रहाणे दूरच परत तरी जायचे कसे ?

कुठेच जागा नाही तर निदान द्वारकामाईत तरी बसावे म्हणून आम्ही बाबांचे दर्शन घेण्यासाठी समाधीमंदिराजवळ आलो. तर साईदर्शनार्थींची रांग लेंडीबागेला वळसा घालून उलट सुलट फिरलेली रांगेचा शेवट कळतच नव्हता. रांगेशिवाय दर्शन नाही. बहुतेक आज बाबंच्या दर्शनाचा योग नाहीच तर ! जशी बाबांची इच्छा. मला उगाचच भरून आलं. माझा जीव तडफडत होता बाबांच्या भेटीला. बाबा आत समाधी मंदिरात आणि मी वेडी बाहेर. दर्शन घडावे कसे ? डोळ्यांतून ओघळणारी आसवे पुसित संथ पाऊले टाकीत मी गुरुस्थानाकड वळले. तिथेही रांगेत बाबांचे दर्शन घेऊन मी द्वारकामाईत शिरले.

द्वारकामाई माणसांनी फुलून गेली होती. मी आत शिरले. बाबांकडे पाहिले.बाबा हसत होते. सारा शिणभाग क्षणात पळाला. बाबा तुझे दर्शन झाले. तुला डोळे भरुन पाहिले. मन भरलं. असेच तुला पहात रहाण्यातच माझा आनंद. तुझ्या पायाशी धावत आले. आता दूर लोटू नको. राजा ! हे जीवन भारी तापलाय, संसारव्यापाने पोळलाय, क्षणभराची शांती तुझ्या पायाशी लाभावी म्हणून धावत आले रे. अशीच पायाशी ठेव. बाबांच्या चरणांना स्पर्श करता करता डोळ्यांतून अश्रू ओघळले. मनातले सारे नजरेने सांगितले. द्वारकामाईत बसून बाबांजवळ पोटभर गप्पा मारण्याचाही आज योग नव्हता तर ! जवळ जवळ वर्षभराचे खूप खूप सांगायचे होते थोडे भले थोडे बुरे सुद्धा. द्यायचे होते तसे घ्यायचे सुद्धा होतेच. पण पुजारी कडकडत होते, ''आगे बढो बाई आगे बढो.

मी आपोआप द्वारकामाईतून खाली मंडपात उतरले.

एव्हाना संध्याकाळ झाली. धुपारतीचे स्वर मनात हृदयात घुमत होते. काय सुंदर सजले असतील बाबा. कोणत्या रंगाची शाल त्यांनी पांघरली असेल ? आणि रत्नजडीत मुकुट घवघवीत पंचारत, उद्धूपाचा मंद सुवास आरतीचे गोड शब्द मधूर अर्थ. बाबा तुझा थाटच काही न्यारा. प्रसन्न चेहरा पाहताक्षणी वाटते धावत जावे आणि त्या पायांना मिठी घालावी. स्वतःला त्या मोक्षदायी चरणांवर झोकून द्यावे. क्षमा, शांती, अमाप दयेचा तो पुतळा. माझा बाबा. पाहता पाहता धनी न पुरे. किती ही पहा. अखंड पहात राहावे असेच ते सुंदर साजिरे रूप. केव्हा ते रूप नजरेला पडते देव जावे.

मला द्वारकामाईत दिवे लावायचे होते. तुळशीवृंदावनाशेजारी बसून मी एक एक पणती मांडू लागले. मुखाने साईनाम चालले होते. ह्यांनी पणत्यात वाती वळून घातल्या. मी तेल घालून एक एक वात भिजवू लागले. एक, दोन, दहा, वीस, किती तरी पणत्याच पणत्या. असंख्य प्रज्वलित झालेल्या पणत्या आणि त्या सुवर्ण प्रकाशात तेजोमय झालेल्या बाबांकडे पहायला मला खूप आवडते. त्या दिव्यांचे पवित्र तेज. काही वेळा वाटते आपणही या दिव्यांपैकी एक व्हावे. प्रकाशमय रूप ल्यावे. त्या रूपाने बाबांना आरती ओवाळावी आणि त्याच तेज ब्रह्मात विलीन व्हावे म्हणूनच बाबांना पणत्या आवडत असतील. मी त्या पणत्यांकडे पहात होते. भान विसरून....

तेवढ्यात.....

मला कोणी तरी समोर उभे असल्याचा भास झाला. मी मान वर केली. माझ्या हृदयातून आपोआप अंतर्नाद उमटला,

बाब... बाब... बाबा...

मूर्तीमंत साई माझ्यासमोर उभी होती. माझी नजर वर पर्यंत पोहचत नव्हती. तरीही ते रूप मी माझ्या नजरेत, मनात साठविण्याचा प्रयत्न करीत होते. बाबा ह्यांच्या पाठीशी उभे होते. आणि माझ्यासमोर ते गोरेपान नक्कीच नव्हते. सुवर्णमय पिवळसर गहू वर्ण. उंचच उंच. माझ्या डोळ्यात ती मूर्ती मावत नव्हती. समोरचे सारे जग तिने झाकून टाकले होते. साक्षात तेज ब्रह्म माझ्यासमोर उभे होते. आणि मी... मनातून, हृदयातून, रोमरोमातून बाबा, बाबा, बाबा ध्वनी स्पंदत होते. मळकटसर जुनी पांढरी कफनी कफनीवर काळसर राखाडी जाकीटासारखं कदाचित शाल दोन खांद्यावरून सोडली असेल डोईला तसाच फडका, खांद्यावर मात्र झोळी. सुवर्णाचा रस ओतावा आणि सारे चमकून जावे तसे मला झाले. त्या तेजाचे वर्णन मी शब्दात करूच शकणार नाही. दृष्टीला दिसत होते ते फक्त तेजब्रह्मसाई. त्यांच्या उभ्या रहाण्याने द्वारकामाई भरून गेली होती. मला अजूनही नवल वाटते. त्यावेळी द्वारकामाईत खरच का कुणी नव्हतं. हृदयाचा भेद करणाऱ्या त्या तेजब्रह्मात मी बुडून गेले. माझी मी उरलेच नव्हते. मनाचा ठाव घेणारी ती नजर ते डोळे हसताना किंचित बारीक झाल्यासारखे वाटले. मंत्रमुग्ध होऊन मी त्या हास्यात बुडून गेले. सारे समजत होतं पण दिङमूढ झाले होते. बाबांना नमस्कार करण्याचे त्यांचे पाय धरावे. निदान उठून उभे तरी राहावे. कसले कसले मला भान नव्हते.

**''आज तुम जो चाहो वो मुझे दे देना।'' ''कुछ भी दे देना।''**

नादब्रह्म ते. त्या आवाजाने मी भानावर आले. मी त्यांच्याकडे पहात हसत म्हटले, ''थांब हं. बाबा तुम्ही माझ्याजवळ मागता. अखिल विश्वाचे आपण मालक. सारी दुनिया तुझ्या पुढे पदर पसरतेय आणि तुम्ही माझ्याजवळ मागता. काय देवू मी तुम्हाला ! माझी मीच तुला सर्वस्वी अर्पण केली आहे. जिथे मीच माझी नाही तिथे....

पण माझ्याजवळ जे आहे तेच तुला आज देत आहे. माझी तुझ्यावरील भक्ती, माझी साईश्रद्धा आणि माझे साईप्रेम. आज मी सारे तुम्हाला अर्पण करते आहे. राहता राहिले मी. शून्य. या शून्याला किंमत नाही. पण तुझ्यामुळे माझे जीवन लाख मोलाचे झाले. माझ्या जीवनाला अर्थ आला. मला सदैव तुझ्या पायाशी ठेव राजा. त्यातच मी स्वतःला धन्य मानीन बाबा... बाबा.. बाबा... अनाहत ध्वनी रोमारोमात गर्जत होता.

मी त्यांच्याकडे हसून पाहिले. ते तुरू तुरू चालत तुळशीवृंदावनाला टेकून माझ्यासमोर बसले. मी माझ्या पर्सकडे पाहिले. पण माझे हात तेलाने माखले होते. हात पुसणार कशाला ? प्रश्न मनात उमटतो न उमटतो, तोच त्याने आपली चौपदरी दोन्ही हातावर अलगद झेलत पुढे केली. माझे डोळे पाण्याने भरून आले. एका सामान्य भक्तासाठी त्या परमेश्वराने एवढे लिन व्हावे ! छे. छे ! मी त्यांना माझ्या शेजारी बसायला लावलं. आणि ते पण 'मी बसा' म्हटले म्हणून माझ्या शेजारी येऊन बसले. बाबा मला क्षमा करा हो. तुमच्या या महावस्त्राला माझे हे मलिन हात पुसण्याची लायकी तरी आहे का?

मी त्यांच्याकडे पहात मान हलविली आणि चटकन साडीला हात पुसले. सारे समजून ते सुद्धा हसले. मी पर्समध्ये हात घातला. फक्त दोन नाणी. खरे तर त्यावेळी माझ्याज़वळ किती तरी रोख रक्कम सुटे पैसे होते. पण असे कसे झाले ! त्याक्षणी माझ्या हातात फक्त दोन नाणी होती. त्यांनी खिशातून आणखी एक रुपयाचे नाणे काढून माझ्या हातात ठेवले. ती तीन नाणी. साईश्रद्धा, साईभक्ती, साईसबुरी. ती तीन नाणी त्याच्या विशाल हातावर चमकू लागली. नाण्याकडे पहात ते तसेच बसून राहिले. मी नामस्मरण करीत पणत्यांकडे पहाण्याचा प्रयत्न करू लागले. पण चित्त त्या साईपरब्रह्मात गुंतले होते ना. मी मान वळवली. ते पुढे सरकला. माझ्याकडे रोखून पहात उठता उठता हसत म्हणाले,

''बेटी कभी गुस्सा नही करना।''

मी नखशिखांत हादरले. ते शब्द आणि ती तेजस्वी नजर माझ्या हृदयात आरपार घुसली. थक्क होऊन मी त्यांच्याकडे पहात राहिले. माझ्या मनात हृदयात ती मूर्ती शिल्पाप्रमाणे आकार घेत गेली मी तेजात बुडून गेले.

क्षणात मी सावध झाले. एव्हाना ते उठून चालू लागले. जाता जाता फक्त त्याने एकवार मान वळवून द्वारकामाईच्या शिळेकडे पाहिले. आणि तसेच ते वेगाने बाहेर पडले.

मी भानावर आले. स्वप्नातून अचानक जाग यावी तशी. पण हे स्वप्न नव्हते. माझे बाबा मला भेटण्यासाठी आले हे सत्य सत्य होते. माझ्या जीवाची तळमळ शांत करण्यासाठी अनेक संकल्प विकल्पांनी घेरलेल्या मनाला मुक्त करण्यासाठी साईवेड्या मनाची साईदर्शनाची आर्त पुरविण्यासाठी लाडक्या लेकिला भेटण्यासाठी बाबा आले. अजूनही तो नादब्रह्म माझ्या मनात घुमत होता, ''दे दो मुझे आज तुम जो चाहे। वो मुझे दे देना। बेटी कभी घुस्सा नही करना। खरच मी बाबांवर रागवले होते खरी आणि तेही स्वतःच्या स्वार्थासाठी. बाबांच्या

शिरडीत येऊन साधी राहाण्याची सोय झाली नाही म्हणून. बाबांचे दर्शन झाले नाही म्हणून. पण मी हे विसरले की बाबा सदैव आपल्यातच आपल्याजवळ आहेत.

**''जिथे माझे स्मरण। तिथे मीच मी राहिलो रे भरून''**

बाबा नाहीत असा एक तरी ठाव सापडेल काय ! कळत पण वळत नाही. बाबा मला क्षमा करा. खूप खूप त्रास देते का हो मी तुम्हाला. पण मी तरी काय करू ? तुमच्या शिवाय मला चैन पडत नाही. तुम्ही समोर दिसला नाहीत तर माझे मन व्याकूळ होते. एक फक्त तू माझा आणि तुझ्यासाठीच सारा अट्टाहास. बाबा मला क्षमा करा. तुमच्या दर्शनाने मी धन्य धन्य झाले. माझे पंचप्राण तृप्त झाले बाबा तुझ्या भेटीच्या आनंदात मी बुडून गेले.

थोड्याच वेळात आजूबाजूच्या गर्दीची कोलाहलाची मला जाणीव झाली. एवढा वेळ ही सगळी माणसं होती तरी कुठे ? माझ्या मनात आता लाख लाख दिवे प्रकाशित झाले होते. एकामागून एक मी सर्व पणत्या लावल्या. प्रकाशच प्रकाश त्या प्रकाशात माझे तन मन उजळून निघाले. आनंदाचे साम्राज्य अवघा आनंदी आनंद मला माझे सद्गुरू अमलानंद म्हणायचे ब्रह्मानंदाचे वर्णन तुला कसे करून सांगू ? तो आनंद ज्याचा त्याने भोगायचा. सत्य होते त्यांच बोल.

अजूनही तेल शिल्लक होते. मी द्वारकामाईतील समयीमध्ये वाती लावल्या. द्वारकामाईतील बाबा प्रसन्नपणे हसत होते. मी ही हसले, खूण पटली. बाबांना नमस्कार केला. मुखावरून हात फिरवला. ''बाबा या वेड्या भक्तांसाठी तू किती किती म्हणून धावशील रे.'' जीवाची धडधड मनाची तडफड थांबली होती. गर्दीही थोडी कमी झाली होती. मी केरसुणी घेऊन द्वारकामाई स्वच्छ झाडली. ह्या स्वच्छ झालेल्या द्वारकामाईप्रमाणे माझे मन ही लख्ख झाले होते. बाबांशिवाय तिथे आता काहीच नव्हते. प्रसन्नमनाचे बाबांचे रूप मनी आठवत आम्ही द्वारकामाईबाहेर पडलो. मला पुन्हा समाधी मंदिराची आठवण झाली. बाहेरूनच नमस्कार करावा म्हणून मी गर्दीतून प्रवेशद्वाराजवळ आले. तोच तिथळे एक सेवेकरी श्रीयुत बोधे मला भेटले. ''दर्शन वगैरे झाले का ?'' त्यांनी चौकशी केली. आम्ही काही सांगायच्या आत ते म्हणाले, ''चला बाबांचे दर्शन घ्या. या माझ्याबरोबर''. लोक बाहेर पडत होते तिथून आम्ही आत शिरलो. मनाला पटत नव्हते. कदाचित बाबांची तशी इच्छा असावी.

मी बाबांचे दर्शन घेतले. खरोखरच बाबा प्रसन्नपणे हसत होते. जणू ते सांगत होते. मी तुझ्याजवळ आहे. मी तुझ्यातच आहे. कुठे तरी त्याचवेळी स्वर घुमत होते...
**''मीच तुझा अन् माझा तू हा भर हृदयी संदेश। मनी वसो हाच एक उपदेश ''**

**शिरडीच्यावाटेवर..**

**.शिरडीच्या वाटेवर मन माझं धावं**
**डोळे भरून पहावं त्याला डोळे भरून पहावं ॥**

**मनामध्ये हृदयात रूप त्याचं ठसलं।**
**गालावर गोड हसू मन माझं भुललं ॥**

**काय त्याचा थाट तो सांगू मी किती।**
**कुबेराला लाजवील त्याची ती श्रीमंती ॥**

**किती किती झुंबरं किती तो प्रकाश।**
**चंद्रसूर्यावीण बाई फिकं ते आकाश ॥**

**पहाटेला काकडआरती मंगल ते स्नान।**
**सप्त सागराचं जल नाही कंची वाण ॥**

**रूप्याचं सिंहासन काय तो थाट।**
**दरबार भरलेला दावी भक्तीची वाट ॥**

**नैवेद्याचे पान बाई अन्नपूर्णा हसली।**
**तिन्ही काळ आरतीला भक्तगणं धावली ॥**

**नाजूक जरीबुट्टी भर्जरी ती शाल।**
**गुलाबाचा हार गळा लाल लाल लाल ॥**

**डोईला फडकं करी मंदिल सोनेरी।**
**लाख हिरे कोंदणात प्रभा ती साजिरी ॥**

**धावत आहे साईपायी मन तिथे रमले।**
**साईदेवा पहाता पहाता देहभान हरले ॥**

**असा माझा साईदेव किती सांगू ते कौतुक।**
**त्याच्याविण नाही मज आता कशातच सुख ॥**

**साई माझा जीव शिव साई माझा भाव।**
**साईवीणा नाही आता दुजा कुठे ठाव ॥**

**साई पायी भक्ती साई माझं प्रेम।**
**जन्मवरी घ्यावं ते गोड साईनाम ॥**

□□□

# साईदर्शन

– धर्माजी पाटील, गडद


मानवी जीवन म्हणजे परमेश्वराचा अंश होय. आम्ही सर्व त्याचीच लेकरे आहोत. या विश्वाचा चालक फक्त तो एकच होय. त्याशिवाय दुसरा कोणीही नाही.

म्हणूनच हे मानवा मनाशी अंतरंगी विचार कर अन् पहा.

हिंदू, मुस्लीम, बुद्ध, ईसाई आदि धर्माचे लोक आपले विचार निरनिराळ्या शब्दात मांडतात अन् म्हणतात की, मी हिंदू, मी मुस्लीम, मी बुद्ध, मी ईसाई. पण सर्वांचा कर्ता एकच असताना आम्ही मात्र अशा वेगवेगळ्या विचारांना कायम घट्ट अशी मिठ्ठीच मारून ठेवलेली आहे. अन् त्यामुळेच आम्ही एकमेकापासून दूर दूर असे आहोत.

साई वचनातून 'सत्यदर्शन' मात्र हे आहे की, 'सबका मालिक एक' अन् 'श्रद्धा सबूरी' या दिव्य भव्य शब्द ब्रह्मांतून निघालेले सूर म्हणजे स्वच्छ, शुद्ध, निर्मळ, निखळ वेदरूपी असे बाहेर पडलेले होते की, हे मानवा, तू या परमेश्वराचा अंश म्हणून आहेस हे मात्र कदापि विसरू नकोस.

पण आज मात्र निरनिराळे धर्म दिसत आहेत अन् आपआपल्या विचारांची जी मते प्रदर्शित करीत आहेत. ती अनादि काळापासून केवळ स्वार्थासाठी म्हणून पडलेले गट होत. कोण देवपूजेसाठी आपआपल्या विचारांच्या धर्माप्रमाणे रोजा, नमाज करतो. तर कोणी जपमाळ जपतो. तर कोण सोळा सोमवार उपवास करून देवाला आपलासा करावयास बघतो. हे सर्व जरी ठीक असले तरी प्रत्येक माणूस हा परमेश्वराचा अंश असताना नको ती द्वैतभावना अन् वैमस्य का ? एक म्हणतो आमच्याच धर्माची तत्त्वे बरोबर आहेत. तर दुसरा म्हणतो आमची धर्मतत्त्वे अशी आहेत; तशी आहेत. शब्द निरनिराळे पण आम्हा सर्वांना जायचं आहे मात्र एकाच ठिकाणी होय.



एक म्हणतो हमारा ईश्वर आदम ? असून आम्ही त्यापासून जन्मलो आहोत. तर दुसरा म्हणतो आम्ही एडम आणि इव पासून जन्मलो आहोत. आमचा ईश्वर तोच आहे. तर तिसरा म्हणतो आम्ही मनू शतरुपीपासून जन्मलो आहोत. त्यामुळे आमचा ईश्वर तोच होय. अशी निरनिराळ्या विचारांनी, अंतरंगी मनाला (ईश्वररूपी) झोपवून आम्ही मात्र स्वतःच फसत आहोत. अन् नको त्या धर्मांधाच्या अज्ञानपणामुळे आम्ही एकमेकांचे वैरी होऊन भांडणतंटे लढाई करू लागलो आहोत.

वास्तविक सत्यधर्म (मानवताधर्म) हे मर्म आम्ही मात्र अंतरंगी झोपविलेले आहे. अन् त्यामुळेच ही एक खोटी अन् स्वार्थासाठीच अरेरावी चाललेली आहे आणि त्याची मात्र आज नको ती कर्मफळे भोगीत आहोत. ईश्वरमात्र (सबका मालिक एक) दूरुनच हे पहात आहे. अन् हसत आहे.

कौरव पांडवांना मार्गदर्शन करताना आणि त्यांचे समेट घडवून आणताना भगवान श्रीकृष्ण ज्यावेळी प्रयत्न करीत होते. त्यावेळी कौरवांचे 'अधर्माचे अज्ञान' पाहून कृष्ण नुसताच हसला असे म्हटलेले आहे. कृष्णाच्या या हसण्याचा गर्भीत अर्थ मात्र कौरवांच्या भौतिक विषय वासनेच्या अज्ञानामुळे त्याना समजत नव्हता. त्यामुळेच त्यानी (कौरवांनी) त्यांचा नाश करून घेतला. ''अधर्मानि हरले ते कौरव, धर्मानि जगले ते पांडव'' हे सर्वश्रूत आहेच.

साईकुराणातील अन् गीतेतील उपदेश, संदेश देत. अन् राम रहीम हे सुद्धा एकच कसे? हे मंदीर मसजीदमध्ये जाऊन दर्शवीत होते.

धरतीवर अधर्म माजत असता माणसानं द्वैतापासून-अद्वैताकडे जावं अन् त्याला सत्यमार्ग मिळावा म्हणून तो जगाचा स्वामी (ईश्वर) संत या रुपात पृथ्वीवर धर्माच्या छायेखाली आणून प्रयत्न करीत असतो. यासाठीच संत जन्म घेतात अन् धर्मजागृती करतात.

**''संत जन्म घेती अन् धर्म जागवीती''**
**''शिर्डी साईदर्शन हेची दर्शविती''**

या सृष्टीत पंचमहाभूतांतील शक्तीतून आपण जन्म घेतलेला आहे. गीतेत उद्धूत केल्याप्रमाणे

**ममैवांशो जीवलोके जीव भूतः सनातनः।**
**मनः षष्ठांनिंद्रियानि प्रकृतिस्थानि कर्षती।**

भगवंत अर्जुनास निवेदन करतात की, हे अर्जुना या प्राकृत जगातील बद्ध जीव माझे सनातन अंश आहेत आणि हे बद्ध अवस्थेत असून मनासह सहा इंद्रियाशी आसक्त होऊन विषय वासनेत गुंतलेले आहेत. यामुळेच त्याना माझा (परमेश्वराचा) विसर पडत चाललेला आहे. म्हणूनच त्याना माझ्याशी एकरुप होण्यासाठी अन् मुक्तीसाठी एक मार्ग आहे; तो म्हणजे भक्ती होय. या भक्तीच्या माध्यमरुपी आरशात त्यानी मला पहावं अन् जन्माचं सुख भोगावं आणि मुक्त व्हावं. आज शिरडी साईदर्शन हेच दर्शवीत आहे.

शिरडी साईबाबांच्या बाबत आज अखिल दुनियेत जे आकर्षण निर्माण झालेले आहे ती एक भगवंताची नैसर्गिक शक्ती म्हणून होय. साईबद्दल आपण जर त्यांचा जन्मगांव, ठाव, ठिकाण यांचा शोध घेतला तर तो आपणास मिळत नाही. मग ही एक शक्ती जन्मास आली तरी कुठून? तर आपल्या भारतीय संस्कृतीतील जसे वेद अपौरुषेय आहेत. त्याचप्रमाणे साईबाबा ही एक अशीच नैसर्गिक शक्ती म्हणजे अयोनी जन्म पावलेली एक भगवंताची शक्ती होय.

साई वचनांतून निघालेले सूर (ब्रह्मवाक्ये) आपणास दर्शवितात की, 'सबका मालिक एक' याबाबत निवेदन करताना आपण सूक्ष्मदृष्टी अंतरंगी जागृत करावयास हवी. जर कोणी आपणास प्रश्न केला किंवा विचारले की, तुमच्या वडिलांचे नाव काय? तेव्हा आपण सहजपणे उत्तर देऊ की, माझ्या वडिलांचे नाव रामदास आहे. त्यानंतर पुन्हा जर आपणास प्रश्न केला की, रामदासच्या वडिलांचे नाव काय? त्याचंही उत्तर आपण देऊ की, रामदासच्या वडिलांचे नाव नामदेव आहे. पुन्हा प्रश्न केला की, नामदेवच्या वडिलांचे नाव काय? त्यांचेही वडिल असतीलच ना? तेव्हा असेच आपण विचारत पुढे पुढे गेलो तर शेवटी उत्तर काय? तर सृष्टीकर्त्या भगवंताची एक शक्ती (श्रीविष्णू) ईश्वर होय. आणि जगातील सर्व धर्मीय त्याचेच अंश होय. म्हणूनच ईश्वर हा आपला प्रत्येकाचा अंशी असून आपण प्रत्येकजण त्याचे अंश आहोत. म्हणूनच 'साईबाबांचे वचन' ''सबका मालिक एक'' हे त्रिकालाबाधित सत्य वचन आहे.

आणि हे समजण्यासाठी हे मानवा! तू शुद्ध, निष्काम, अनासक्त अशी माझी भक्ती कर अन् अंतरंगी 'श्रद्धा-सबूरी' धर त्यामुळे तू माझ्याशी एकरुप होशील. अन् तुला ते माझे सगुण, निर्गुण, साकार निराकार, परब्रह्म काय आहे ते दिसेल. आणि मग तू त्या ब्रह्मसागरात न्हाऊन निघशील, अन् मोक्ष पावशील.

साई अद्वैताचा साक्षात्कार; साई मानवता धर्माचा ईश्वरी अवतार, कोणी दिगंबर दत्त म्हणा तर कोणी विठ्ठल रखुमाई म्हणा, कुणी साऊली माऊली म्हणा, कुणी जगत जननी म्हणा, तर कोणी रामरहीम म्हणा, अल्ला अकबरही म्हणा कारण साईबाबा मंदीरामध्ये तसेच मसजिदमध्येही दर्शन देत.

**इथं ना मुस्लीम ना हिन्दू**
**ना शीख ना आणखी कुणी**
**आम्ही सारे मानवता**
**धर्माचे धनी।**

यामुळे आपणास हीच प्रचीती पहावयास मिळते की, साईबाबांनी जाती, धर्म, विषमता यांना मूठमातीच दिली होती. साई परब्रह्मस्वरुप म्हणून गुरुपौर्णिमा, दसरा, रामनवमी यावेळी तर शिरडीचा महिमा काय वर्णावा! किती गर्दी त्या शिरडीत लोटते! मुंग्यांसारखी माणसे साईदर्शनासाठी धाव घेत असतात. शिरडीला जणू भक्तीचा मोगराच फुललेला दिसतो. दैनंदिन जीवनसुद्धा शिरडी म्हणजे मानवी जीवनाची सरळ, सोपी, शुद्ध जीवनाची हिरवळ वाट होय. अन् त्या वेटेने सारे भक्तजन साईभक्तीचा सुगंध घेत, घेत मंदिरात दर्शन घेऊन आपले सुखशांतीचे हीत करून घेत असतात.

आलेला कोणीही रिकामा म्हणून परत जात नसतो. त्याला साईकृपा ही लाभलेलीच असते. तो जाताना सुगंध घेऊन जात असतो. अन् आपल्या जीवनात (संसारात) सुगंध निर्माण करीत असतो.

❑❑❑

# श्री साईबाबांचे कार्य

– प. धो. गुळूमकर

मानवी जीवनात सुखदुःखाचे उन-पावसाळे सतत चालू असतात. सुखाच्या क्षणाने काही वेळा तो सर्व जगाला विसरतो. दुःखामध्ये फक्त स्वतःचाच विचार करतो हे सुख दुःखच कवच जन्मापासून अगदी शेवढापर्यंत माणसाला चिटकून राहते. प्रत्यक्ष ईश्वराला जेव्हा अवतार घ्यावे लागले तेव्हा त्यांची सुद्धा यामधून सुटका झाली नाही.

परंतु मानवाला हे सर्व सहन करावेच लागते. या चक्रामधून माणूस बाहेर पडून समाज देश धर्म यांचे ऋण कसे फेडेल याचाच विचार बाबांनी केला. अन् त्यांनी कार्याला सुरुवात केली.

सर्व प्रथम त्यांनी सर्व मानव जात एक आहे याची प्रचिती अनेक चमत्काराच्या माध्यमातून दिली. चमत्कार हे मानवी मनाला प्रभावी करणारं साधन आहे हे त्यांनी मनोमन ओळखलं होतं.

ते नेहमी म्हणत चमत्कार हे माझ्या साधनेच फळ आहे. साधुसंताच्या जीवनात अनेक चांगले वाईट प्रसंग आहे. त्यांनीही चमत्काराच्या माध्यमातून जनजागृती केली असं म्हटलं तर वावग ठरणार नाही.

ईश्वराचं खरं स्वरूप काय? त्याच चिंतन कशाप्रकारे करावे अन् कर्मकांडामधून खरंच ईश्वर प्राप्ती होते का? या सर्वांची शिकवण त्यांनी साध्या आणि समाजाला समजेल अशा स्वरूपात दिली.

माणसाने कोणतेही कार्य केलं की त्याच फळ लगेच मिळाव अशी अपेक्षा असते. त्याचा स्वभावाच तसा असतो, म्हटलं तर वावग ठरणार नाही. बाबाच्या वचनाचा विचार केला तर गीतेची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेशु कदाचन्, अन् तुम कर्म पर श्रद्धा रखो और सबुरीसे फल लो. म्हटले ते अगदी सामान्यत्त्वाने म्हणाले होते.

जीवनात काही वेळा दुःखाचे इतके प्रसंग येतात की माणूस त्यावेळी विवेक अन् सारासार विचार, बुद्धी पार विसरून जातो, जीवनात मरगळ निर्माण होते. जीवन जगण्याची उभारी निघून जाते सारं जीवन निराशायमय होतं. अन् त्याचवेळी बाबाचे बोल आठवतात तुम अल्ला मालीक को याद करो अल्ला मालीक तेरा भला करेगा। हीच संजीवनी जीवन नौका दुःखरुपी समुद्राला पार करण्यास सहाय्यभूत होते.

समाजात साधुसंताना दिलेली वागणूक अन् त्यापायी त्यांनी सोसलेला छळ, त्यांना किती मनस्ताप झाला असेल याचा विचार जरी मनात आला तरी अंगावर शहारे येतात. व्यक्ती कधीही एकदम महान होत नाही त्याला बरेवाईटपणाचे अनुभवच महान करतात असं म्हणावं लागेल. एवढ सगळ सहन करून त्यांनी आपल विहीत कर्म सोडलं नाही. त्यांनी समाजाला, मानवाला योग्य दिशा दाखविली.

ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज अशा कितीतरी महा विभूतींनी या समाजाला, मानवाला घडवलं. त्यांनी आपल सर्व आयुष्य मानव कल्याणासाठी वेचल दुःखात कधीही कर्म सोडल नाही. पण आपल दुर्दैव असं की आपल्याला त्यांची किंमत फार उशीरा समजली त्यावेळी वेळ निघून गेलेली होती. काळ हा कोणासाठी थांबत नाही.

ज्यावेळी समाज अंधारात चाचपडत होता त्यावेळी साधुसंतांनी दिपस्तंभासारखी भूमिका घेऊन समाजाल मार्गदर्शन केले. नैतिकतेचा प्रकाश दाखवला. त्यांच्या कार्याची उतराई व्हावी असे वाटत असेल तर त्यांची शिकवण अनुभवावी लागेल.

साधुसंताच्या वेळचा समाज आणि आताचा समाज काही वेगळा आहे असे नाही. स्वार्थ, धोकेबाजी, हेवेदावे या गर्तेतून समाज अद्यापही बाहेर पडत नाही. मंदिर, मसजीद, चर्च यांची संख्या नुसती वाढत आहे. समाजासाठी काही कराव असं काही वाटत नाही. आज कितीतरी गोष्टी समाजासाठी करता येण शक्य आहे. तरुणांना योग्य मार्गदर्शन नसल्याने युवाशक्ती वाया जात आहे.

ज्ञानेश्वर माऊलीनी ज्याप्रमाणे सांगितले तसेच बाबांनी ही जसं सांगितलेली, 'समाजाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा' हेच ब्रीदवाक्य प्रमाण मानून कार्य केल तर ती बाबांच्या चरणी खरीखुरी सेवा घडेल. अन् त्यांनी केलेल्या कार्याची परंपरा पुढे चालविण्याचे समाधान मिळेल.

❑❑❑

शिरडी वृत्त

# शिरडी संस्थानचा ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

– श्रीराम विष्णू सातर्डेकर


श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधि सप्तशताब्दी निमित्त श्री साईबाबा संस्थान शिरडी तर्फे संतज्ञानेश्वर संजीवन समाधी सप्त शताब्दी निमित्ताने आयोजित ''ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा शनिवार दि. २३ नोव्हेंबर ते शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर, १९९६ पर्यंत स्वतंत्र उभारलेल्या श्री संत दासगणू व्यासपीठ मंडपात साजरा झाला.

दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ७ पर्यंत समाधि मंदिरातून वीणा, पताका, श्री साईबाबा, श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या तसबिरी व ग्रंथराज ज्ञानेश्वरी यांचे मिरवणुकीने पारायण मंडपात आगमन झाले.

माननीय अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी श्री. द. म. सुकथनकरसाहेब यांनी दीप प्रज्वलीत केल्यावर वेदमंत्रपठण, मंगल कलश आणि ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन आणि आरती झाली.

सकाळी ७.३० ते ८.३० सामुदायिक प्रार्थना परमपूज्य श्री **वरदानंदभारती** यांचे प्रवचन नंतर ११.३० पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ६.३० श्री **वरदानंदभारती** यांचे सुश्राव्य किर्तन, ६.३० ते ८ साईबाबा वारकरी शिक्षण संस्था निमगाव येथील मुलांचे हरिपाठभजन, रात्रौ ८॥ ते ९॥ श्री **वरदानंदभारती** यांचा प्रश्नोत्तरे आणि विष्णु सहस्त्रनामाचे सामुदायिक वाचन याप्रमाणे नियमीत वेळेवर कार्यक्रम झाले. गुरुवार दि. २८ नोव्हेंबर रोजी रात्रौ १०.३० ते १२ ह.भ.प. भानुदास महाराज देगलुरकर यांचे सुश्राव्य किर्तन झाले. शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते ९ पारायणसमाप्ति आणि जवळजवळ ३ हजार भाविकांची डोक्यावर ज्ञानेश्वरी ग्रंथ घेऊन निघालेल्या भव्यदिव्य मिरवणूकीत असंख्य गावकरी मंडळी आणि साईभक्त सामील झाले होते. शोभायात्रा पारायण मंडपात आल्यावर १० ते १२ श्री मनुमहाराज यांच्या श्रवणीय काला किर्तनाने सांगता झाली. परमपूज्य श्री **वरदानंदभारती** यांच्याहस्ते श्री साईबाबा संस्थानतर्फे श्रीफळ प्रसाद सर्व भाविकांस दिल्यावर हा ८ दिवसांचा अपूर्व सोहळा संपला.

❑❑❑



# साई वंदना



## मनाच्या मंदिरात नांदो साई

नको क्रोध, नको द्वेष.
मनाचे क्षितीज
असावे निर्मळ.

नको लोभ, नको गर्व
मनाचा दीप
तेवावा शांत.

नको मोह, नको काम
देहाचा हा राजा
असावा स्थितप्रज्ञ.

नको आळस, नको असत्य
मनाचे निर्माल्य
व्हावे न कधी

असो नित्य साईध्यास
मनाच्या मंदिरात
नांदो साई.

❑ प्रा. मिलिंदकुमार जोशी


## एक साई भजावा!

तुझी सावळी मूर्ती सामान्यरुपी।
गुडी धुम्रपानाची कधी शीघ्र कोपी।
मनीचा परी मंत्र साधा जपावा ।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥१॥

बहू साधन संपदाही अनेक।
व्रते देव संकल्प सिद्धी अनेक।
सदा रामदासा असे हा विसावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥२॥

सदा एक नामे वदा पूर्ण कामे।
मनी ध्यावे सदा नित्य कामे।
कधी राम साई कधी साई ध्यावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥३॥

असा एक नामे महादोष जाती।
असा नाम मात्रे गती पावि जेती।
असा एक नामे घडे पुण्य ठेवा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥४॥




सदा गर्भवासी असे जीव सारा।
सदा यातनांचा तया भार सारा।
मनी तूच चिंती वदे देव देवा ।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥५॥

भावाची मना भीति ही तापदायी।
मना वाटते शृंखला लोह पायी।
सदा भक्तीचा मार्ग शिंपीत जावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥६॥

असे दुःख सारे मुळी सुख नाही।
रहाटी जगाची तरी चालते ही।
असे मुक्तीचा तू आम्हा एक ठेवा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥७॥

जरी भक्तिचे मार्ग विस्तारलेले।
जरी मुक्तीचे मंत्र उच्चारलेले।
परी एक नामे तोच लाभ घ्यावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥८॥

जगी निर्मिली एक माया प्रभूने।
बुडाले तिथे जावे हे दीनवाणे।
अशा वादळी सागरी दीप घ्यावा ।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥९॥

कुणी त्या म्हणे साई कोणास प्रभू।
कुणी बुद्ध मालीक जो तो पिपासू।
परी अंतरी ईश जाणून घ्यावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥१०॥

वसे दत्तरूपी वसे रामरूपी।
अगे व्यापिले विश्व ही रीत सोपी।
मनी चिंतनी ध्यानरूपी दिसावा ।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥११॥

म्हणा नाम साई म्हणा गान गाई।
बघा एक साई सदा ध्यान साई।
असा मंत्र हा सर्व काळी जपावा।
प्रभाते मनी एक साई भजावा ॥२॥

❑ जयंत ललित

# पुरे झाला शोध !

❑ वसंत जोशी ❑

गेलो मी एकदा।
अनंता, दयाळा ।
भेटाया तुजला ।
मंदिरात ॥१॥

मंदिरात तुझ्या।
माणसांची दाटी।
एकमेका रेटी।
मागे पुढे ॥२॥

रुपाया टाकोनी।
खरेदिती हार।
धूप नि कापूर।
लावतात ॥३॥

मीही उभा दारी।
रांग लावोनिया।
तुला पाहवया।
आसुसलो ॥४॥

मंदिराचा गाभा।
अखेरी गाठला।
तरी न दिसला।
माझा देव ॥५॥

मंदिरात होती।
मूर्ती पाषाणाची।
छिन्नी हातोड्याची।
किमया ती ॥६॥

पाषणाची फुले।
वाहिली ती कुणी।
नैवेद्याच्या गोणी।
ओतलेल्या ॥७॥

समया जळती।
उदबत्ती धूप।
देव तरी गप्प।
झाला कोठे ? ॥८॥

रुपये चांदीचे।
देवा ठेवूनिया।
त्याला पळवाया।
पाहतात ॥९॥

मंदिरात देवा।
तुझे सोपस्कार।
तुझा साक्षात्कार।
कोठे नाही ॥१०॥

मंदिर सोडोनि।
कोठे तू गेलासी।
कोणा भेटायासी।
सांग राया ॥११॥

देवळाची घंटा।
वाजली तत्क्षणी।
सांगितले कानी।
काही गूढ ॥१२॥

भिकाऱ्यांच्या रांगा।
मंदिरा बाहेरी।
रोगी नि म्हातारी।
माझी रूपे ॥१३॥

धरी त्यांना उरी।
डोळे त्यांचे पूस।
त्यांच्या मुखी घास।
देरे बाबा ॥१४॥

त्यांचे देह जीर्ण।
भाजती उन्हात।
शीत पावसात।
गारठती ॥१५॥

झाकावया द्यावी।
जुनेरी वसने।
तेणे त्यांची मने।
सुखावती ॥१६॥

आकाशी, सागरी।
पर्वत, डोंगरी।
पाषाण मंदिरी।
मी न राही ॥१७॥

रस्त्याच्या कडेला।
खोपटात जीर्ण।
तेथे माझी खूण।
आढळेल ॥१८॥

दुःखितांचे आर्त।
करावाया दुरी।
धाव तू सत्वरी।
माझ्या भक्ता ॥१९॥

कधी वळुनिया।
मागे तुझ्या पाही।
तुझी सावलीही।
मीच असे ॥२०॥

# कांची पीठाचे श्री. चंद्रशेखरेंद्र स्वामी महाराज

**म. पां. वाळींबे**, सातारा.



**७** मे १९९३ रोजी शंभराव्या वर्षात पदार्पण केलेल्या कांची कामपीठावरील (सर्वज्ञपीठावरील) ६८ वे पिठाधिपती शंकराचार्य श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामीजींचे वास्तव्य १९८० सालचे चातुर्मासात सातारा येथे होते.

दक्षिणेकडील महास्वामीजींचे वास्तव्य येथील श्रीमत आद्य शंकराचार्य मठात आहे ही बातमी सर्वत्र पसरली. प्रथम दर्शनाचा योग मला १९८० च्या जुलै महिन्यातील पहिल्या सोमवारी आला. महाराजांच्या अलौकिक व्यक्तीमत्त्वाचा परिचय नव्हता. सायंकाळची ७ वाजताची वेळ. महाराजांच्या दर्शनासाठी मठात लांबच लांब रांग लागलेली. रांगेत उभा राहिलो. प्रत्येक दर्शनार्थीस जवळून महाराजांच्या दर्शनाचा लाभ होई. महाराजही सर्वांना स्मित वदनाने हात उंचावून आशीर्वाद देत.

दर्शन खिडकीजवळ पोहोचल्यावर रुद्राक्षांच्या माळांचा टोप परिधान केलेल्या महाराजांच्या पदांबुजांचे प्रथम दर्शन झाले, आणि नंतर महाराजांचे कृपाकटाक्षाचा लाभ झाला. क्षणातच सर्वांगातून एक अवर्णनीय सर्वोच्च आनंदाची लहर निर्माण झाल्याची जाणीव झाली. महाराजांनी आशीर्वाद दिला. महाराजांच्या सान्निध्यातील तो अत्युच्च आनंदाचा क्षण विसरणे केवळ अशक्य ! सत्पुरुषाचे सान्निध्य लाभणे आणि दर्शनाचा लाभ होणे यासाठी पूर्वजन्मीचे सुकृत असावे लागते हा अनुभव मी आयुष्यात प्रथमच घेतला. कारण तसे या जन्मी आतापावेतो काही विशेष पुण्य घडलेच नाही. फक्त महाराष्ट्रात घरोघरी मोठ्या भक्तीभावाने वाचली जाणारी श्रीगुरु चरित्राची पोथी मात्र नित्य वाचत असे. घराण्यात दत्त भक्ती व उपासना चालू आहे. **श्री नृसिंहसरस्वती स्वामी** महाराज आणि **श्रीपाद श्रीवल्लभ स्वामीजी** हे दत्त संप्रदायातील महापुरुष महाराष्ट्रात झाले **महाराष्ट्र तर साधू संताचे जणू माहेरच !** याच महाराष्ट्रात **ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, नामदेव, चोखामेळा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार** इ. अनेक संत झाले. अगदी अलिकडे या शतकातच ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, **शिरडी श्री साईबाबा, गाडगे महाराज,** गजानन महाराज इ। महापुरुषही झाले. भारत तर ऋषीमुनींचा देश म्हणून साऱ्या जगात परिचित आहे. परंतु मानवी मनाची अशी प्रवृत्ती आहे, की प्रत्यक्ष अनुभूती आल्याशिवाय समाधान

होत नाही. मोठे मोठे संत भूतकाळात होऊन गेले. अध्यात्म क्षेत्रातील सर्वांचाच अधिकार सारखा .होत नाही. तरी सत्पुरुषाने दर्शनाचा, सान्निध्याचा आनंद याची देही आणि याची डोळी लाभणे हे ''अहो भाग्यम्'' असेच म्हटल्यास वावगे ठरू नये.

महास्वामीजी दक्षिणेकडील तामीळ प्रातांतील असल्याने भाषेची अडचण व त्यामुळे त्यांचे बद्दल प्रथम आम्हाला माहिती नव्हती, परंतु नंतर मात्र त्यांचे इंग्रजी मधील चरित्र पुस्तक (दी सेज ऑफ कांची) वाचण्यात आले आणि या महान संताची थोडी ओळख झाली.

**महाराजांचा थोडक्यात परिचय :**

आद्य शंकराचार्य साक्षात भगवन शंकराचा अवातर इ. स. पूर्व ५०९ या वर्षी केरळ मधील कालडी या गावी त्यांचा जन्म झाले. अवैदिकांचा पराभव करून अद्वैत मताचा प्रसार त्यांनी अत्यंत प्रभावीपणे केला. कैलास पर्वतांवर साक्षात् शिव शंकरांनी त्यांना दर्शन दिले आणि अनुग्रहपूर्वक स्फटिकांची पाच शिवलिंगे दिली. जगद्गुरू श्री आद्य शंकराचार्यांनी वैदिक धर्म प्रसारासाठी बद्रिकेदार, जगन्नाथपुरी, द्वारका आणि शृंगेरी येथे चार मठ स्थापले आणि नंतर शंकराचार्य स्वामी दक्षिण भारतातील कांची येथे आले. तेथे श्रीचक्राची स्थापना करून ते कांची पीठावर (जे सर्वज्ञ पीठ म्हणून परिचित आहे) आरुढ झाले. साक्षात् शिव शंकरांनी दिलेले चंद्रमौळीश्वराचे स्फटिक लिंग आणि महात्रिपुरसुंदरी ही त्यांची उपास्य दैवते ! आज जवळ जवळ अडीच हजार वर्षे या दैवतांची त्रिकालपूजा कांची पीठामध्ये अव्याहत चालू आहे.

**''समाजातील विविध प्रकारचे लोक माझेकडे येतात. कारण, माझ्या ठायी त्यांना ईश्वराचा साक्षात्कार होतो. याचा अर्थ माझे ठिकाणी काही खास गुण आहेत असे नव्हे. परंतु त्यांची माझ्यावरील असणारी नितांत श्रद्धा याचेच हे प्रतिक आहे. त्यांची श्रद्धा पाहून माझे मन पुलकीत होते. हा विश्वास आणि श्रद्धा ठेवून केलेली कोणतीही गोष्ट मला अतीव आनंद देते. व त्यातूनच मला शक्ती मिळते.''**

आद्य शंकाराचार्य क्रमाने ६८ वे आचार्य (पीठाधिपती) आहेत जगद्गुरू चंद्रशेखरेंद्र स्वामीजी. २० मे १८९४ म्हणजेच वैशाख कृष्ण प्रतिपदा, अनुराधा नक्षत्रावर स्वामीजींचा जन्म दक्षिण भारतातील तामिळनाडू मधील अर्काट जिल्ह्यात विलूपूरम गावी झाला. स्मार्त ऋग्वेदी कानडी ब्राह्मण घराण्यात जन्मलेल्या बालकाचे जन्मनाव स्वामीनाथ. एका धर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न घराण्याचा वारस त्यांना लाभला होता. शिवाय ते स्वतः कुशाग्र बुद्धीचे जन्मजात लेणे घेऊनच जन्माला आले होते. सर्व विषयांत त्यांना विलक्षण गती होतीच शिवाय भक्तीचे वरदानही त्यांना लाभले होते. श्री नटराजाची उपासना ते बालवयातच मोठ्या भक्तीने करीत. सर्व शालेय विषयाबरोबरच संगीत, नाट्य, चित्र साहित्य कलामध्ये ते निपुण होते.

स्वामीनाथन् फक्त दहा अकरा वर्षाचे असताना कांची पीठावरील ६६ वे आचार्य दिंडीवनम् येथे आले होते. स्वामीनाथ्न् त्यांच्या दर्शनास गेले असताना, ह्या तेजस्वी बालकातील असामान्यत्व त्यांनी नेमके हेरले. कांची पीठाधिपतींनी स्वामीनाथन्ची चौकशी केली आणि त्याच क्षणी कांची पीठाचे भावी पीठाधिपती म्हणून मनात हेरून ठेवले. पुढे दोनच वर्षांनी १९०७ साली सहाष्टावे आचार्य समाधिस्थ झाले. अखेरच्या दिवसात त्यांनी स्वामीनाथन् यांच्या वडिलांना ह्या मुलासह तातडीने येण्यासाठी निरोप पाठविला, पण निरोप वेळेवर पोहोचू शकला नाही. श्री. चंद्रमौळीश्वर आणि त्रिपुरसुंदरी देवीच्या पूजेत खंड पडू नये म्हणून स्वामीनाथनचे मावसभाऊ, सदुष्टावे आचार्य म्हणून पीठावर नियुक्त केले गेले. पण विधिघटना वेगळीच होती. ६७वे आचार्य फक्त आठ दिवस पाठीधीश्वर म्हणून कांची पीठाला लाभले. त्यांचाही अंतःकाळ येऊन ठेपला आणि वेगाने हालचाली करून फक्त तेरा वर्षाच्या स्वामीनाथन् यास अडुसष्टावे आचार्य म्हणून नियुक्त केले. अवघ्या तेरा वर्षाच्या बालकाला अनपेक्षितपणे संन्यासधर्माचा स्वीकार करावा लागला. स्वामीनाथन् **'चंद्रशेंखरेंद्र सरस्वती'** झाले.

जगद्गुरुपदाची धुरा समर्थपणे पेलता यावी म्हणून वेदशास्त्रे, पुराणे यांचे शिक्षण त्यांना देण्यात आले. संस्कृत,तामीळ, मराठी, हिंदी, कानडी इ. भारती. भाषा शिवाय इंग्रजी, फ्रेंच, जर्मन इत्यादी परकीय भाषांचा अभ्यासही त्यांनी केला. स्वामीजी खरोखच ज्ञानसागर होते. तपस्या, वैराग्य आणि दैवी गुण त्यांच्या ठायी वसत होते.

## शिकवण

जगद्गुरू या संज्ञेप्रमाणे आचार्यांची शिकवण ही केवळ हिंदू धर्माकरिताच फक्त नव्हे, तर अखिल मानवजातीसाठी आहे. जागेच्या अभावी विस्ताराने उल्लेख करणे शक्य नाही. तथापि सारांशाने काही खालीलप्रमाणे :-

आद्य शंकाराचार्यांच्या अद्वैत मताचा पुरस्कार आणि प्रसार

महाराजांनी केला. अद्वैत मताचे कोणत्याही धर्माशी किंवा पंथाशी भांडण नाही. सर्वांना मुक्तद्वार आहे. अद्वैताचा (परमेश्वरीशी एकरूप होण्याचा) अनुभव सर्व ठिकाणी घेणे हाच धर्मीयांचा किंवा सांप्रदायिक पंथाचा समान (एकमेव) उद्देश असतो. आद्य शंकराचार्यां प्रमाणेच आचार्यांचा दृष्टिकोण सर्वकष असल्यामुळे भिन्न दृष्टिकोन असणाऱ्यांशी जुळते घेतांना आचार्यांना कधीच अडचण पडली नाही.

विविध पंथाच्या आणि धर्माच्या साधुसंतांनी अद्वैताचा अनुभव घेतला व दुसऱ्यांच्या अनुभवात ते समरस झाले. इतरांना त्यांनी मार्गदर्शनही केले.

सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करण्याची महाराजांची तळमळ, साधी राहणी लोकांना स्वीकारावी यासाठीचा त्यांचा आग्रह, परमेश्वराच्या विविध रुपापैकी कोणत्याही रूपामध्ये उपासना करण्याविषयीचा त्यांचा नित्योपदेश, ध्यान धारणा आणि एकाग्रता यांची शिकवण, वेदांताचा अभ्यास करण्याविषयीचे त्यांचे आवाहन आणि सत्याची अनुभूती घेण्याविषयीचा त्यांचा उपदेश अखेर अद्वैताकडे नेणारे आहेत. अद्वैत मार्गात भगवंतास स्थान नाही अशी विनाकारण आणि निराधार टीका केली जाते. परंतु परमेश्वराच्या कृपा प्रसादामुळे अद्वैताचा अनुभव प्राप्त होतो हेच सत्य आहे. आणि म्हणूनच आचार्यांच्या शिकवणुकीत भगवतपूजेला फार मोठे स्थान आहे. भगवत् पूजेशिवाय भगवंताचे आशिर्वाद लाभू शकणार नाहीत असे त्यांचे ठाम मत होते.

अध्यात्म मार्गातील आपल्या प्रगतीसाठी आणि अंतिम सत्याप्रत जाणाऱ्या ध्येयाप्राप्तीसाठी आपल्याला आवडलेल्या देवताची उपासना करणे आवश्यक आहे. निदान प्रथमावस्थेत तरी मुलाला चालायला शिकवणाऱ्या पांगुळगाड्याप्रमाणे उपासना व पूजा यांचा निश्चितच उपयोग होतो. प्रथम आपण स्वतःच्या कल्याणासाठी आणि इच्छापूर्तीसाठी प्रार्थना करतो. नंतर हळूहळू आपण 'सर्वे सुखिनः सन्तु' या अखेरच्या पायरी पर्यंत पोहोचतो. हेच प्रार्थनेचे खरे स्वरूप होय. येथेच द्वैतभावाचा विराम पावतो.

### सबका मालिक एक

**निरनिराळ्या धर्मातील परस्पर सामंजस्य या विषयीचा उल्लेख आचार्यांच्या प्रवचनातून वारंवार आला आहे. कोणीही आपला धर्म बदलण्याचे कारण नाही. कारण सर्व धर्मातील तत्त्वे बव्हंशी सारखीच आहे. याचा अर्थ हर एक धर्म तंतोतंत समान आहे असे नव्हे ! पण सर्व धर्मामध्ये 'सर्वश्रेष्ठ ईश्वर एकच आहे. हे तत्त्व समान आहे. (सबका मालिक एक, एकोही देवा केशवः) धर्मा धर्मात परस्पर विरोध आहे असे मानण्याचे कारण नाही. तसेच साचेबंद साम्यही सर्व धर्मांमध्ये असण्याची आवश्यकता नाही 'परस्पर सामंजस्य असले म्हणजे पुरे' हिंदूची अशी श्रद्धा आहे म्हणूनच ते सहिष्णू आहेत.**

**हिंदुत्व हे फक्त वैयक्तिक मुक्तीसाठीच आहे असे नव्हे, तर ते जगाच्या कल्याणासाठी आहे. हिंदूंचे वेद सर्वांसाठी आहेत. कारण कोणत्याही धर्मातील उदात्त तत्वाचा उगम वेदात आहे.**

आपल्यातील पाशवी भावनांवर विजय मिळवून सत्कर्म, सच्चरित्र्य, उपासना आणि ज्ञान ह्यांची कास धरुन मानवाने आत्मशुद्धी केली पाहिजे. खाणे, पिणे आणि मजा करणे एवढेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट नाही. सत्कर्माने पुण्यसंचय होतो. ऐहिक उन्नतीचेच फक्त ध्येय ठेवणारे शिक्षण तरुण पिढीला देता कामा नये, तर धर्माबद्दल आस्था वाढवणारे शिक्षण तिला दिले पाहिजे. ध्यान धारणेमुळे मन:शुद्धी होऊ शकते. मन:शुद्धीनंतर पुण्यकर्मच होते.

मंदिरे ही भक्तीची जोपासना करणारी स्थाने आहेत. भक्तीमुळे माणसाला दु:ख सहन करण्याची शक्ती मिळते. ती शक्ती देणाऱ्या मंदिरातील देवतेला माणूस कृतज्ञतेने फुले फळे इत्यादि अर्पण करतो.

उत्पत्ती आणि लय ही कार्ये ईश्वरी प्रेरणेने अव्याहत चालू असतात. ईश्वर सर्वत्र आहे. स्थिर आहे. परिपूर्ण आहे. निष्कलंक आहे. त्याची उपासना केल्याने मन स्थिर आणि पवित्र होते. म्हणून भगवंताची भक्ती प्रत्येकाने केली पाहिजे. मात्र वैयक्तिक व्यावहारीक लाभासाठी परमेश्वराची भक्ती करणे योग्य नाही. परमेश्वर सर्वज्ञ आहे. आपल्याला काय द्यावयाचे हे त्याला माहित आहे. तो स्तुतीचा लोभी नाही. तो भाव भक्तीचा भुकेला आहे. हे जाणून मन:शांती मिळावी एवढ्याच उद्देशाने प्रार्थना करावी.

''गुरु म्हणजे साक्षात् परमेश्वर आहेत. आदर्श जीवनाची दिशा गुरुदेव आपल्याला दाखवून देतात. परमेश्वर दिसत नाही, पण गुरुदेव आपल्याला प्रत्यक्ष दिसतात. ते सुख दु:खाचा समन्वय घालण्यास शिकवतात. सुख व दु:ख अपरिहार्य आहे असे पटवून देतात. ही गुरुंची केलेली अवास्तव स्तुती नाही. गुरुच ब्रह्मा विष्णु आणि महेश आहेत. तेच परब्रह्म आहेत हे पूर्ण सत्य आहे.''

### पायी भारतभ्रमण

श्रीमद् आद्य शंकराचार्यांच्याप्रमाणे महाराजांनी भारतभ्रमण केले. **वयाच्या २५व्या वर्षी त्यांनी पदयात्रा सुरू केली ती २१**

**वर्षानंतर संपली**. या पदयात्रेत त्यांनी हिंदुस्थानच्या अंतरंगाचा अगदी जवळून परिचय करुन घेतला. १९७८ ते ८३ या काळात ऐंशी वर्षे उलटून गेलेल्या जगद्गुरुंनी कांचीपूरम् ते सातारा आणि सातारा ते परत कांचीपूरम् अशी हजारो मैलांची पदयात्रा केली. **महाराज कधीच वाहनांत बसत नसत.**

आपल्या वयाला साठ वर्षे पूर्ण होताच त्यांनी उत्तराधिकाऱ्याची निवड केली. श्री जयेंद्र सरस्वती स्वामीजी कांचीपीठाचे ६९वे शंकराचार्य झाले. योग्यवेळी पीठाचे ७०वे शंकराचार्य निवडले गेले आहेत. श्री शंकर विजयेंद्र सरस्वती असे त्यांचे संन्यास नाम आहे.

**महाराज कोणाकडून कोणत्याही वस्तूचा, धनाचा स्वीकार करीत नसत.** पण साधूसंतांच्या दर्शनासाठी जाताना रित्या हाताने जाऊ नये असा रिवाज आहे. दर्शनार्थी बरोबर फुले व फळे नेतात. ते लगेचच ती फळे वाटून देत. दक्षिणा पीठाच्या अधिकाऱ्याकडे पाठवून देवून पावती देत. दक्षिणेच्या स्वरुपात आलेले धन विविध धार्मिक उपक्रमासाठी, सेवाभावी संस्थांसाठी वापरले जाते.

**महाराज समाधिस्थ होण्याच्या आधी काही दिवस त्यांचेजवळ कागदावर संस्कृतमध्ये लिहिलेला खालील प्रमाणे संदेश मिळाला. :-**

**मैत्रीं भजत अखिलहृज्जेत्रीम्**
**आत्मदेव परानपि पश्यत।**
**युद्ध त्यजंत स्पर्धां त्यजत –**
**त्यजत परेष्वक्रमणाक्रम्॥**
**जननी पृथिवी कामदुधास्ते**
**जनको देव : सकलदयालु :।**
**दाम्यत, दत्त, दयध्वं जनता :**
**श्रेयो भूयात सकलजनानाम्॥**

**(मराठी काव्यात रुपांतर)**

**मैत्रीने सर्वांची अंतरे जिंकावी।**
**इतरांच्या ठायी मीच ऐसे पाही।**
**लढाया संपवा सोडून द्या स्पर्धा।**
**अनुचित हल्ला सदैव टाळावा॥**
**पृथिवी आपुली आई – कामधेनू।**
**देव कनवाळू पिता सकळांचा।**
**लोकहो व्हा संयमी दयाळू नि दानी।**
**सकळा भूतांचे घडावे कल्याण॥**

१९१९ ते ३९च्या या विजययात्रेत (२१ वर्षांची पदयात्रा) राहून गेलेल्या भारतातील प्रदेशाचा दौरा त्यांनी १९७८ साली सुरु केला. हगरी, बल्लारी, सोंडूर, होसपेट या मार्गाने ते हंपीला आले. तेथे सहा महिने मुक्काम करुन तेथून हुबली-धारवाडमार्गे २२ जून, १९८० रोजी जगद्गुरुंचे सातारा शहराबाहेरील कुरणेश्वर मंदिरात आगमन झाले. सज्जनगड येथील श्री समर्थांच्या समाधीचे दर्शन घेऊन येथील श्रीमद् आद्य शंकराचार्य मठात आले. सातारा येथे जवळजवळ अकरा महिने महाराजांचे शिष्यांसह वास्तव्य होते.

१९८०चा चातुर्मास साताऱ्यास झाला. चातुर्मासात दोन महिने महाराजांचे वास्तव्य एके ठिकाणी असते हे सर्व भक्तांना महित असल्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातून विविध क्षेत्रांतील महाराजांचे भक्त दर्शनासाठी आले. त्यामध्ये राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, अर्थमंत्री, गृहमंत्री, इ. येऊन गेले. **स्पेनची राणी, ग्रीसचे राजकुटुंब, डॉ. ड्रॅमॅटियन** (फ्रेंच) असे काही पाश्चात्यही दर्शन करुन आशिर्वाद घेऊन गेले. याच मुक्कामात साताऱ्यातील राम-ध्यान मंदिरात राम, लक्ष्मण, सीतामाई, हनुमान यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. तसेच दक्षिणेतील चिदंबरम्ची जणू प्रतिकृती असणाऱ्या उत्तर चिदंबरम् नटराज मंदिर या भव्य वास्तूची निर्मिती झाली. भारतात श्री नटराज मंदिरे ही दोनच आहेत. एक दक्षिणेत व दुसरे साताऱ्यांत. १९८४ साली महाराजा कांचीपूरम् येथे शिष्यांसह पाहोचले व पदयात्रेची सांगता झाली.

महाराजांच्या साताऱ्यातील वास्तव्यामुळे शाहूनगरीस जणू क्षेत्राचे स्वरुप आले होते. असंख्य भाविक दर्शन घेऊन गेले. मी तर महाराजांच्या प्रथम दर्शनानेच एवढा प्रभावित झालो की, सातारा मुक्कामी वारंवार दर्शनाचा लाभ तर मी घेतलाच, परंतु साताऱ्याहून कांचीपूरम् जाईपर्यंत जेथे त्यांचा मुक्काम असे त्याठिकाणी मी दर्शनासाठी जात असे. खरे तर मी जात असे, असे म्हणण्यापेक्षा गुरु महाराजांचे ठायी असलेल्या नि:स्सीम भक्तीने खेचला जात होतो असे म्हणणे योग्य होईल. नंतर कांचीपूरम् येथील श्रीमद् आद्य शंकराचार्य मठात तर वर्षातून किमान एकदा तरी मी नेमाने जात असे.

१९ मे, १९८१ या महाराजांच्या ८८व्या जन्मदिनी सातारा येथील श्रीमद् जगद्गुरु श्री शंकराचार्य सेवा समितीने 'अमृतानुभव सरिता' हे भावपुष्प अर्पण करुन महाराजांची शाहूनगरीतील वास्तव्याची स्मृती अक्षर करुन ठेवली आहे.

### त्रिकाल ज्ञानी

महाराज केवळ सत्पुरुषच नव्हे तर, **त्रिकाल ज्ञानी, अंतर्ज्ञानी सिद्धपुरुष** होते. सर्व भक्तांविषयी समभाव होता.

गरीब, श्रीमंत, सुशिक्षित, अडाणी हा भेदभाव नव्हता.

**''द्वेष न कोणाचा करी। सर्वत्र समभाव धरी।**
**तोची साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा॥''**

या महान मंत्राला जगद्गुरुंनी पुन्हा एकदा संजीवनी दिली. सान्यांना त्यांची अनुभूती साकारुन दाखविली. श्रीगुरुंच्या प्रती असणाऱ्या भक्तांच्या भावनेस प्रतिसाद मिळे व त्याची प्रचितीही येईल.

**''जया मनी जैसा भाव तैसा तया अनुभव।**
**दाविसी दयाघना ऐसी तुझी ही माव॥''**

सर्व संत आणि सत्पुरुषांच्या संदर्भात असलेल्या वरील उक्तीची महाराजांच्या सान्निध्यात प्रचिती येईल.

**भक्तांना आलेले काही निवडक अनुभव :**

महाराजांचे वास्तव्य कर्नाटकातील उगार येथे असतांना अशी घटना घडली :

एके दिवशी सायंकाळी महाराजांची आपल्याबरोबर असलेल्या बालसुब्रमण्यम् (बालू) या शिष्यास बोलावून सांगितले, ''उदईक सकाळी पुण्याहून एक विद्वान संस्कृत पंडित येणार आहेत. त्यांचा शाल व श्रीफळ देवून गौरव करावयाचा आहे.'' उपस्थित भाविकांना थोडे आश्चर्यच वाटले. कारण उगार हे ठिकाण तसे शहरापासून दूर असून, गावात केवळ नित्योपयोगी गरजेच्या वस्तूच मिळत. कापडाची मोठी दुकाने नाहीत.

महाराजांनी सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी उगारला पुण्याहून कवीश्वर शास्त्री नावाचे वैदिक संस्कृत पंडित आले. महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर महाराजांनी त्यांना बाजूस बसवून घेतले. एवढ्यात मद्रासहून कारने एक मोठे धनिक व्यापारी, महाराजांचे भक्त दर्शनासाठी आले. एक उत्तम जरीची शाल त्यांनी महाराजांना अर्पण केली. महाराजांनी तीच शाल आणि एक नारळ देऊन शास्त्रीबुवांना गौरवले.

गुलबर्ग्याजवळ असलेल्या महागांव येथील वडवाळसिद्ध नागनाथ महाराजांचे मठांत महाराजांचे सुमारे ८ महिने वास्तव्य होते. त्यावेळची घटना : मठसंस्थानचे अधिपती श्री. बापूसाहेब महाराज यांची संस्थानसाठी देणगी मिळालेली परंपरागत शेती आहे. शेती वाट्याने दिली असून त्यांच्या वाटेकऱ्याच्या घरी लग्न होते. बरीच पाहुणेमंडळी जमलेली. कार्य पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी वाटेकऱ्याच्या लक्षात आले की घरात चोरी झाली आहे. बायकोच्या हातातील दोन बांगड्या चोरीस गेल्या. गेलेली वस्तू परत मिळणे कठीण होते कारण पाहुण्यांपैकीच कोणीतरी चोरी केलेली. गरीब बिचारा वाटेकरी या प्रसंगाने हतबल झाला आणि मठाधिपती श्री. बापूसाहेब महाराज यांच्याकडे येऊन त्याने आपली व्यथा सांगितली. बापूसाहेब महाराजांनी त्यास सांगितले, ''कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्यांचें वास्तव्य मठात आहे. त्यांच्याकडे जाऊन त्यांना ही घटना सांग. ते तुला निश्चित मार्गदर्शन करतील.''

दोघेही महाराजांच्याकडे गेले व वाटेकऱ्यांने आपले दुःख महाराजांना सांगितले. गरीब बिचाऱ्या वाटेकऱ्याची महाराजांना दया आली व त्यांनी खुणेने त्यास बाजूस थांबण्यास सांगितले.

एवढ्यात मद्रासहून एक मद्रासी स्त्री महाराजांचे दर्शनासाठी आली. दर्शन खिडकीजवळ येऊन दर्शन घेतल्यानंतर महाराजांनी आशिर्वाद दिला व तिच्या हातातील सुवर्ण कंकणाकडे बोट दर्शवून 'दोन' अशी खूण केली. त्या स्त्रीने तत्परतेने आपल्या हातातील दोन सुवर्णकंकणे काढून महाराजांना अर्पण केली. महाराजांनी त्या वाटेकऱ्यास ती घेण्यास सांगितले.

गरीब बिचारा वाटेकरी ती कंकणे घेईना. बाईंच्या हातातील ककणे (परधन) मी कसे घेऊ ? असे तो म्हणू लागला. अखेर बापूसाहेब महाराजांनी सांगितले की महाराजांना अर्पण केलेली कंकणे महाराजांनी तुला दिली आहेत, तेव्हा त्यांनी त्याचा स्वीकार केला.

**''जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥**
**तोची साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा॥''**

महाराजांना गरीबांच्या दुःखाची किती कणव होती हे दिसून येते.

### काही स्वानुभव

(१) महाराष्ट्राची विजय यात्रा करुन महाराजा कांचीपूरम्‌ला गेल्यानंतरही मी दरवर्षी किमान एकदातरी दर्शनास जात असे. मनातील ओढ एवढी जबरदस्त की, आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने हजारो मैलाचा प्रवास करुन श्रीगुरु दर्शनास जाई। आप्तेष्ट व काही मित्रमंडळी मला ''गुरु वेडा'' म्हणत। परंतु मला तर खरोखर धन्यता वाटे। कारण हे वेड कल्याणाप्रत नेणारे आहे असा माझा पूर्ण विश्वास।

महाराजांचा १९८४ सालचा चातुर्मास कांचीपूरम् येथील श्रीमद् आद्य शंकराचार्य मठात झाला. श्रीगुरु दर्शनासाठी गेलो. त्यावेळी बरोबर महाराजांच्या महाराष्ट्र कांचीपूरम् पदयात्रेतील विविध भक्तांचे असाधारण अनुभव, संकलीत करुन मराठीत टाईप करुन घेतले व ते महाराजांना अर्पण करावे असे मनात

योजले. कांचीपूरम्ला गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीगुरुदर्शनासाठी रांगेत उभा राहिलो. मठात नित्य रोज सकाळ, संध्याकाळ हजारो भाविक तरी दर्शनास येत ! रांगेतून माझा नंबर आल्यानंतर फळे, फुले, श्रीफळ महाराजांना अर्पण केली व आठवणीची फाईलही पुढे ठेवली. महाराजांनी फाईल उघडण्याआधीच खुणेने विचारले, ''भक्तांचे स्वानुभव आहेत काय ? मी 'होय' असे सांगितले.

महाराजांनी फाईल उघडली व एक दृष्टीक्षेप टाकून शिष्याकरवी मला विचारले, ''संस्कृत येते काय ?'' या अनपेक्षित प्रश्नाने मी चमकलो ! 'संस्कृत समजते'. मी उत्तर दिले. प्रथम पृष्ठावर श्लोक लिहिला होता.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ।**
**गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ॥**

(मनात आले श्लोक टाईप करण्यात चूक झाली असावी.) महाराजांनी शिष्याकरवी माझ्याकडे फाईल दिली व वाचण्यास सुरुवात केली. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु:' एवढ्यात महाराजांनी शिष्यांकरवी मला थांबण्यास सांगितले. वाचनामध्ये काही चूक झाली असावी असे मनात येते तोच महाराजांनी पुढील प्रश्न केला - ''तुझे गुरु कोण आहेत ?'' हाही प्रश्न अनपेक्षित होता. श्रीगुरुचरित्र मी नित्य वाचत असे. (श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्री नृसिंहसरस्वती स्वामी महाराज तर होऊन गेले, त्यांना आम्ही पाहिले नाही) मी उत्तर दिले, ''माझे गुरु आपणच समोर बसला आहात.'' महाराजांनी स्मित वदनानी आशिर्वाद दिला. माझ्या डोळ्यातून खरोखर आनंदाश्रू वाहू लागले ! माझ्या गुरुभक्तीस पावती मिळाली होती. मनोमन मी धन्य झालो !

(२) कांचीपूरम्ला महराज गेल्यानंतर नेहमी दर्शनाचा योग लाभणे अशक्य म्हणून नित्य आराधनेसाठी महाराजांचे बसलेले आहेत असे २'' x ३'' चे तैलचित्र (पोर्ट्रेट) वाई येथे विश्वकोशमध्ये आर्टिस्टचे काम करणाऱ्या श्री. वसंतराव गोंधळेकर यांच्याकडून तयार करुन घेतले. पोर्टेट इतके सुंदर आणि हुबेहूब तयार झाले की, महाराज समक्षच समोर बसले आहेत असे वाटावे ! पोर्टेट घेऊन कांचीपूरम्ला जावे व महाराजांचा स्पर्श करुन आणावे ही मनातून तीव्र इच्छा, म्हणून पोर्टेट बरोबर घेऊन गेलो. १९८८ सालचा डिसेंबर महिना. सकाळी महाराजांचे दर्शन घेतले. दर्शनार्थींची खूपच गर्दी होती. शिष्यांनी मला दुपारी बोलावले. दुपारी ४ वाजता पुन्हा मठात गेलो. महाराजांचे दर्शन झाले. गुलाबपुष्पांनी स्पर्श करुन पोट्रेट मला परत दिले. ते अनुग्रहीत पोट्रेट उत्तमपैकी फ्रेम करुन मी नित्य आराधनेसाठी बैठकीमध्ये ठेवले. भक्तांची इच्छा श्रीगुरुमहाराज पूर्ण करतात.

## गुरु भावाचा भुकेला

(३) १९८९ साली महाराजांचा ९५वा जन्मदिन. यावेळी साताऱ्याहून उत्तमपैकी ९६ कंदी पेढा महाराजांना अर्पण करण्यासाठी बरोबर नेले. बँकेत नोकरीस असल्याने लीव्ह फेअर कन्सेशन (प्रवासभाडे खर्च व रजा मिळे) रजा असल्यामुळे प्रथम कन्याकुमारीला गेलो व येताना मदुराईमार्गे कांचीपूरम्ला आलो. जून/जुलै महिन्याचे दिवस. पावसाळा सुरु झालेला. त्यामुळे बॉक्समध्ये ठेवलेले पेढे हवेतील आर्द्रतेमुळे थोडे ओलसर होवून खराब झाले. बुरशी आल्याप्रमाणे झाले. कांचीपूरम्ला संध्याकाळी पोहोचल्यावर प्रथम स्नान करुन तडक शंकरमठात महाराजांचे दर्शनासाठी गेलो. संध्याकाळी ७ वाजून गेलेले असल्यामुळे दर्शनार्थी भाविकांची गर्दी खूपच कमी झालेली. महाराजांच्या शिष्यांकडून पेढे काढण्यासाठी शिप्तर मागून घेतले व पेढे अर्पण करण्याची मनातील इच्छा महाराजांच्या कानावर घालण्याविषयी श्रीकंठन् या शिष्यास विनंती केली. त्यांनीही तसे महाराजांना सांगितले.

परंतु माझी मात्र थोडी तारांबळ उडाली. सातारहून महाराजांना अर्पण करण्यासाठी उत्तम पेढे आणले आणि ते प्रवासात हवेतील आद्रतेमुळे ओलसर झालेले. मनातील इच्छा, एक व प्रत्यक्ष परिस्थिती ही अशी ! अखेर एक एक याप्रमाणे शिप्तरातून पेढा काढून पंचाने स्वच्छ करु लागलो. या खटाटोपामध्ये २०/२५ मिनिटे गेली. महाराजांची विश्रांतीची वेळ (रात्री आठ वाजता) झाल्यामुळे श्रीकंठन् येऊन गडबड करु लागले. 'जल्दी करो, महाराजका विश्रांतीका समय हुआ है । अखेर आठ वाजले आणि माझी स्वच्छा मोहिम पूर्ण झाली. शिप्तरामध्ये ते ९६ पेढे व्यवस्थित लावून शिष्यांकरवी महाराजांपुढे ठेवले. मनात शंका होती की, महाराज स्वीकार करतील काय ? पण आश्चर्य - महाराजांनी २/३ पेढे एखाद्या लहान मुलाने तोंडात टाकावेत, त्याप्रमाणे खाल्ले, आणि प्रत्येक पेढ्यातील एक एक तुकडा खाऊन तो शेष पेढा बाजूला ठेवावा याप्रमाणे ९६ पेढ्यांचा स्वीकार महाराजांनी केला. त्यातील एक पेढा श्री जयेंद्र सरस्वती स्वामीजींना व एक श्री शंकर विजयेंद्र स्वामीजींना देण्यासाठी शिष्यास सांगितले व राहिलेले पेढे दर्शनार्थी येतील त्यांना द्यावे अशा सूचना शिष्यास दिल्या. भक्तांच्या मनातील भक्तीभाव ओळखून त्याची इच्छा श्रीगुरु महाराज पूर्ण करतात हे सत्य आहे. माझे शेजारी एक दक्षिणी दर्शनार्थी भक्त उभा होता. 'आप पुण्यात्मा है ।' तो म्हणाला, महाराज स्वत: कशाचाही स्वीकार करत नाहीत. अर्पण

केलेल्या वस्तू, फळे, फुले ते लगेच वाटून टाकतात ही प्रथा. पण ही प्रथा महाराजांनी माझ्यासारख्या क्षुल्लक भक्तासाठी मोडली. अहो, 'गुरुदेव भावाचा भुकेला' असेच म्हणावे लागेल !

(४) ७ मे, १९९३ रोजी महाराजांनी १००व्या वर्षात पदार्पण केले ! १९९३-९४ वर्ष हे महाराजांचे जन्मशताब्दि वर्ष म्हणून साजरे करण्याचे महाराजांच्या असंख्य शिष्यांनी (केवळ भारतीयच नव्हे, तर जगातील शिष्यांनी) ठरविले ! महाराजांना सुवर्णाभिषेक करण्याचे ठरविण्यात येऊन २६ मे ही तारीख निश्चित करण्यात आले.

१९९२च्या चातुर्मासात कांचीपूरम् येथे गेलो होतो. शताब्दि सोहळ्याचा एक भाग म्हणून महाराजांचे चरित्र जगातील सर्व भाषात करण्याचे ठरले. देशोदेशी महाराजांचे शिष्य आहेत. विविध धर्माचे आणि विविध पंथाचे. यासाठी ७०वे पीठाधिपती प. पू. श्री शंकर विजयेंद्र सरस्वती स्वामीजी यांनी पुढाकार घेतला होता. संध्याकाळची वेळ होती आणि अगदी मोजकेच भाविक उपस्थित होते. महाराजांचे चरित्र मराठीत, विस्तृत आणि माहितीपूर्ण असे नव्हते ! आतापर्यंत महाराजांचे संदर्भात मी काही मूळ इंग्रजीतील लेखांचा मराठीत अनुवाद केला होता हे प. पू. श्री शंकर विजयेंद्र स्वामीजींना माहित होते. 'तुम्ही मराठीत महाराजांचे चरित्र लिहा' महाराजांनी मला सांगितले. जगद्गुरुंचे चरणी सेवा करण्याची उत्तम संधी मिळाली होती. मी तात्काळच उत्तर दिले अगदी आनंदाने ! फक्त महाराजांची चरित्र लिहिण्यासंबंधीची आवश्यक माहिती मराठीत उपलब्ध नसल्याने एखादे इंग्रजी पुस्तक उपलब्ध झाल्यास मराठीत वास्तवपूर्ण चरित्र लिहिण्यास उपयोग होईल असे मी धाकट्या महाराजांना विनंती केली. महाराजांनी ताबडतोब ''परमाचार्य'' हे इंग्रजीतील पुस्तक दिले. या शिवाय ''ए सेज ऑफ कांची'' हे श्री. टी. एम् पी महादेवन यांनी लिहिलेले इंग्रजी पुस्तक मजजवळ होते. या दोन पुस्तकातून आवश्यक ती माहिती संकलीत केली आणि महाराजांचे आदेशाने आणि कृपाशिवार्दाने, पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील मराठी विषयाच्या प्राध्यापिका, डॉ. शशीकला ना. गोरे (याही महाराजांच्या परमभक्त) मी संकलीत केलेल्या माहितीचे पुनर्लेखन करून शब्दांकन केले व उत्तम चरित्र ''जगद्गुरू'' हे महाराजांनीच पूर्ण करून घेतले. शब्दांकन केलेले चरित्र आम्ही मठांतील श्री. नीळकंठ दीक्षित (यांना मराठी उत्तम समजते) यांना वाचून दाखवले. या संदर्भात एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो तो असा की, श्री. नीळकंठजी यांनी आम्हास प्रथमच सांगितले की महाराजांना चमत्कार आवडत नाहीत. यावर आम्ही श्री. दीक्षित यांना विचारले की, जगद्गुरुंचे संदर्भात चमत्कार होतात ते कसे ? याचे त्यांना दिलेले उत्तर समर्पक वाटते !

''सत्पुरुषांचे, योग्यांचे संकल्प परमेश्वर पूर्ण करतो, कारण ते नित्य वचन किंवा संकल्प खरा होता.''

### कनराभिषेक

देवरूप गुरुंना कनकाभिषेक केल्याने देशाचे दुर्भिक्ष नाहीसे होते. सुबत्ता नांदते अशी धार्मिकांची श्रद्धा आहे. जन्मशताब्दीचे सोहळ्याचा भाग म्हणून महाराजांच्या अनेक शिष्यांनी आणि भक्तांनी कांची मठात महाराजांना सुवर्णाभिषेक केला. यापूर्वी ३ वेळा महाराजांना कनकाभिषेक करण्यात आला होता. सुवर्णाभिषेक सोहळा हा विसाव्या शतकातील एक चमत्कारच होय. कारण योगी पुरुषाच्या जन्मशताब्दी वर्षात महाराजांना सुवर्णाभिषेक करण्यात आला हा योगच अति दुर्मिळ.

जन्मशताब्दी वर्षातच महाराज शनिवार, मार्गशीर्ष वद्य एकादशी रोजी दुपारी २.५० वाजता समाधिस्थ झाले. त्या दिवशी अनुराधा नक्षत्र (महाराजांचे जन्म नक्षत्र) होते. प. पू. श्री. जयेंद्र सरस्वती स्वामीजी व श्री. शंकर विजयेंद्र स्वामीजी दोघेही जन्मशताब्दी कार्यक्रमासाठी तांबरम् (मद्रास) येथे गेले होते.

महाराजांचे प्रथम आराधना दिवशी कांचीपूरम येथील शंकराचार्य मठात गेलो असता, महाराजांच्या सान्निध्यात चाळीस वर्षे असणाऱ्या त्यांच्या परमशिष्याला श्री. कन्नन स्वामींजीना मी विचारले, ''आपण महाराजांच्या सान्निध्यात इतकी वर्षे होता, महाराज समाधिस्थ झाल्यानंतर आपणांस कधी महाराजांचा दृष्टांत किंवा दर्शन झाले काय ?'' त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. 'महाराज माझ्या हृदयात आहेत. दृष्टांताची काय आवश्यकता ?''

❑❑❑



# अभिप्राय




मा. कार्यकारी संपादक सप्रेम नमस्कार

मी वर्गणीदार झाल्याबरोबर मला नोव्हेंबर-डिसेंबर ९६चा अंक प्राप्त झाला. आनंद वाटला. अंकामधील 'श्री साईबाबांची बोधवाक्ये' एक चिंतन अतिशय बोधप्रद, सुबक व मनाला विचार करण्यासारखे वाटले. तसेच दत्तात्रयासंबंधी 'दत्तजन्माच्या पुराणकथा' या लेखाद्वारे इत्थंभूत दत्ताची माहिती, अनुसयादेवीबद्दलची परीक्षा कशी घेतली गेली याची उद्‌बोधक माहिती दिल्याबद्दल शतश: धन्यवाद.

**ॲडव्होकेट के. एन. सताळकर**
लातूर.

## प्रांजळ संपादकीय आवडले

मा. कार्यकारी संपादक

'श्री साईलीला' दसरा विशेषांक वेळेवर मिळाला. आपले सुबोध व प्रांजळ संपादकीय खूपच आवडले तसेच अन्य सर्व लेख वाचनीय आहेत. मांडणी, संपादन मुखपृष्ठ सर्वच उत्तम !

**कवी योगेश्वर अभ्यंकर**



# साईभक्तांना आवाहन



प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

---------- इथे कापा ----------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किमंत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४''X २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २''X ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४''X २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई ( ४ रंगात) | १०''X १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती ( ४ रंगात) | १४''X २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती ( ४ रंगात) | १०''X १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती ( ४ रंगात) | ७''X १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा ( ४ रंगात) | १४''X २०'' | २.६० |
| १०. | द्वाकामाईत बसलेले बाबा ( ४ रंगात) | १०''X १४'' | १.३० |
| ११. | द्वाकामाईत बसलेले बाबा ( ४ रंगात) | ७''X १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो ( ४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी ( ४ रंगात) | ७''X १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४''X २०'' | २.१० |


सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



**आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाव्दारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशी पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.**


रघुपति
राजाराम
पतित
साईंनाम





श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक मार्च–एप्रिल ९७ ■ रुपये ८

# श्री साईलीला

**अमृतमहोत्सवी वर्ष**



**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ॥**

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सो. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. धोर्डे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

**श्री साईलीला**

वर्ष ७५ अंक १२

**मार्च - एप्रिल १९९७**

: संपादक :

**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :

**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :

**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :

**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

: मुखपृष्ठ :


**हरेश जाधव**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अमृतमहोत्सवी वर्षारंभ अंक (१९२३-१९९७)



# अंतरंग


- **संपादकीय** : विद्याधर ताठे — २
- **साईवंदना** — ४
- **अमृतमहोत्सवी वाटचालीतील अमृतकण** — ५
- **संत एकनाथांचे भावार्थ रामायण** : डॉ. नरेंद्र कुंटे — ६
- **रामायणातील हनुमान** : गजानन कुलकर्णी — १५
- **विष्णुसहस्त्रनाम** : स्वामी वरदानंद भारती — २२
- **परब्रह्मीचे ठसे – ज्ञानदेवादी भावंडे** : एस. ए. कुलकर्णी — २५
- **संत नरसिंह मेहता** : अशोक मोहिते — २९
- **आस** : अशोक अर्धापुरे — ३३
- **तुकोबाचा परमार्थमय प्रपंच** : डॉ. अशोक प्रभाकर कामत — ३४
- **आयुर्वेद महात्म्य** : डॉ. संभाजीराव निंबाळकर — ३९
- **गुरु महिमा** : तात्या सिंगनूरकर — ४१
- **नेत्र तंत्र** : डॉ. ग. वा. तगारे — ४३
- **अभिप्राय** — ४६
- **आवाहन** — ४७
- **ग्रंथसूची** — ४८

# संपादकीय

विद्याधर ताटे






# अमृतमहोत्सवी वाटचाल

**शिरडी क्षेत्राची वारी करा। पाय बाबांचे चित्ती धरा।**
**जो अनाथांचा सोयरा। भक्तकाम कल्पद्रुम ।।**

शिरडी क्षेत्राची महती दिवसेंदिवस प्रचंड वाढत असून **'शिरडीला मुंग्यांसारखे भक्त येतील'** हे बाबांचे वचन सत्यात आलेले आपण प्रत्यक्ष पाहत आहोत. बाबांच्या निर्वाणास सुमारे ७९ वर्षे झालेली आहेत, पण त्यांच्या अस्तित्वाची, त्यांच्या सानिध्याची प्रचिती आजही भाविक भक्तांना येते.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून।**
**तरी मी धावेन भक्तांसाठी ।।**

हे श्री साईबाबांनी भक्तांना दिलेले अभयवचन आजही अनेक भक्तांच्या अनुभवास येते. या रोकडया अनुभवामुळे - साक्षात प्रचितीमुळेच भक्तांचा लोंढा दिवसेंदिवस शिरडीकडे आकर्षित होत आहे. श्री क्षेत्र शिरडी हे केवळ एक धार्मिक क्षेत्र नव्हे तर जातपात, धर्म-पंथ भेदरहित नव्या मानवधर्माची - विश्वबंधुत्वाची जननी आहे. श्री साईबाबांची अमेरिका - मॉरिशस - नेपाळ, लंडन आदी ठिकाणी निर्माण होत असलेली मंदिरे विज्ञानयुगातील एक आश्चर्य आहे. विज्ञानाच्या वाढत्या प्रसाराने लोक अश्रद्ध होतील, देवा-धर्माचे समाजातून उच्चाटन होईल अशी काही पाश्चात्य समाज चिंतकांनी केलेली भविष्यवाणी खोटी ठरली असून विज्ञानाने उपभोगाची विविधता वाढली असली तरी माणसांचे एकूण स्वास्थ्य व सुखसौख्य वाढले आहे असे दिसत नाही. विज्ञानाने सुखलोलुप माणसाला काही नवे-नवे उपभोग जरुर दिलेले आहेत, पण अंतिम श्रेयस काय? याविषयी माणसांचा भ्रमनिरासच केलेला नव्हे काय? असो.

श्री साईबाबा संस्थान शिरडी येथे बाबांच्या काळापासून प्रारंभ झालेल्या **श्री रामनवमी सोहळ्या**निमित्त संस्थान व शिरडी नगरी सज्ज झाली असून अशा या रामनवमी उत्सवाच्या पर्वकाळामध्ये **श्री साईलीला**चा हा मार्च-एप्रिल ९७ चा **रामनवमी विशेषांक** आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. **एक दुग्धशर्करा योग म्हणजे या रामनवमी पासून 'श्री साईलीला' नियतकालिक अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे.**

**१९२३ साली रामनवमीच्या** उत्सवानिमित्ताने **'श्री साईलीला'** चा श्रीगणेशा झाला होता. आज गेली ७४ वर्षे हे नियतकालिक अखंडपणे प्रकाशित होत आहे याबद्दल श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या विश्वस्तांचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे. वृत्तपत्रसृष्टीमध्ये उत्साहाच्या भरात अनेक नियतकालिके सुरू होतात, पण उत्साह ओसरताच ती बंद पडतात. **७५**